म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय बाल वा.
दा. क्र. 23६९



IRBK-0102369
IRBK-0102369

# आपलें राष्ट्रीय सरकार

रा. वि. पटणकर

अ॰ २८८९

# आपलें राष्ट्रीय सरकार

मराठी ग्रंथ संग्रहालय,
अनुक्रम २८८९
विभाग बी-१
नों. दि.

लेखक :

रा. वि. पाटणकर, एम्. ए.

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा,
वा. क्र. २३६२
बी-१

IRBK-0102369

IRBK-0102369

१९४६

त १। रुपया

सोल एजंट
**अ. अं. कुलकर्णी**
कॉंटिनेंटल प्रकाशन
१९६।१६ सदाशिव,
पुणें २.

मुखपृष्ठावरील चित्र : श्री. दलाल, मुंबई.

प्रकाशक :
**के. एस्. गुते,**
६९१ बुधवार,
पुणें २.

मुद्रक :
**एस्. व्ही. पोरे,**
चैतन्य प्रिंटिंग प्रेस,
३७३ शनवार, पुणें २.

# अनुक्रमणिका


१ नव्या मनूचा उदय ९

२ कंपनीकडून शाही-
सत्तेकडे १५

३ नव्या भारताचा जन्म २८

४ वेस्टमिंनिस्टर काय-
द्याच्या स्वराज्याकडे ४३

५ रणक्षेत्रांतून स्वातंत्र्य-
मंदिराकडे ६३

६ हिंदुस्थानचे व्हॉइसरॉय ७९

७ उपसंहार ८५

# कॉंटिनेंटल प्रकाशनचीं प्रकाशित पुस्तकें

**श्री. वि. स. खांडेकर**

नवा प्रातःकाल ( दु. आ. ) २॥
पूजन ( ,, ) ३
पहिल्या वहिल्या २।
गोफ आणि गोफण ३

**श्री. वि. वि. बोकील**

' वसंताच्या लीला '
बेबीचा भाऊ ( दु. आ. ) ३
चिमखडे २॥
साडेतीन शहाणे ३
वसंत ३
भाऊ–भाऊ २॥

**श्री. द. र. कवठेकर**

नादनिनाद १॥
चांदण्यांतील सांवल्या ३
शालन ३
मंदा २

**श्री. ना. धों. ताम्हनकर**

आमचे हे ३
मामा ( दु. आ. ) २
विद्या मंदिरांत ।॥।

**श्री. ना. ह. आपटे**

मी वाट पाहीन २।
एकटी ५

**श्री. चिं. वि. जोशी**

संचार २॥
ओसाडवाडीचे देव २

**श्री. साने गुरुजी**

अमोल गोष्टी ( दु. आ. ) २

**श्री. र. गो. सरदेसाई**

स्वाति १॥

**श्री. ' धनंजय '**

कलावंतांच्या सहवासांत ३

**श्री. सौ. शांता नाशिककर**

नीलेचा दिलरुबा २

**श्री. गं. त्र्यं. माडखोलकर**

जीवन-साहित्य २॥

**काकासाहेब कालेलकर**

जीवन आणि समाज १।॥

**श्री. शामराम ओक**

धोंड्याचे कळे २।

**श्री. जे. एल्. रानडे**

गोड ललकाऱ्या १॥

**श्री. जी. एस. पाटणकर**

मधुर चिजे १।

**श्री. गोपीनाथ तळवलकर**

अनुराधा २

**श्री. चिरडे**

भंगलेली मूर्ति २

**श्री. दत्त उद्धव वैद्य**

मोगरीचा गजरा १॥

**श्री. त्र्यं. रं. देवगिरीकर**

घटना परिषद २

**श्री. भा. कृ. केळकर**

सुभाष ३॥

**श्री. रा. वि. पाटणकर**

आपलें राष्ट्रीय सरकार १।

# लेखकाचे दोन शब्द

दीडशें वर्षांच्या ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या पिळवणुकीनंतर या वर्षी प्रथमच "राष्ट्रीय सरकार" अस्तित्वांत आलें. हंगामी राष्ट्रीय सरकारच्या गेल्या साडे-तीन महिन्यांच्या कारभारामुळें त्याच्या बलाबलाची पुरेपूर कल्पना देशाला आलेली आहे. या सरकारच्या दौर्बल्याची व मर्यादांची जाणीव, त्यांतील मंत्र्यांइतकी कोणासच नसेल. मीरत येथील राष्ट्रसभेच्या अधिवेशनांत पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू व गृहमंत्री सरदार पटेल या उभयतांनीं हंगामी सरकारच्या उणीवांवर झगझगीत प्रकाश पाडला. बंगालमधील अभूत-पूर्व व आसुरी हत्याकांडाचे वेळीं हस्तक्षेप करण्याचा अधिकार या राष्ट्रीय सरकारास नसल्याची अत्यंत कटु व दाहक जाणीव आपल्याला असल्याचें जनतेच्या पुढाऱ्यांनीं जगजाहीर केलें; पण या मर्यादित 'राष्ट्रीय सरकारां'-तूनच खरें स्वतंत्र, सार्वभौम, राष्ट्रीय प्रजासत्ताक लोकराज्य निर्माण होण्याचा संभव कसा आहे हेंहि त्यांनीं आत्मविश्वासानें व दूरदृष्टीच्या ठामपणानें जगाला सुनावलें. याच आपल्या राष्ट्रीय सरकारनें अमेरिकेंत स्वतंत्र हिंदी वकिलात पहिल्यानें स्थापन केली; व जगांतील रशिया, चीन, फ्रान्स यांसारख्या देशांशीं स्वतंत्र वकिलाती स्थापण्याची खटपटहि केली आहे. त्या प्रयत्नास फल येण्याचीं सुचिन्हेंहि दिसूं लागलीं आहेत. माणुसकीला काळीमा आणणारा आफ्रिकेंतील गोऱ्या लोकांचा आपल्या भाईबंदांवरील जुलूम आंतरराष्ट्रीय

संघटनेच्या बेशीवर यशस्वीपणें मांडतां आला, तो या राष्ट्रीय सरकारच्या पाठिंब्यामुळेंच !

हंगामी राष्ट्रीय सरकार स्थापन झालें तें घटनापरिषदेचें काम झपाट्यानें होऊन हिंदुस्थान लवकर स्वतंत्र व्हावा म्हणून. ब्रिटिश मंत्रिशिष्टांची घटना-समितीची योजना मान्य असणाऱ्या पक्षांचेंच हंगामी सरकार बनविण्याचें ठरल्यानें लीगमंत्र्यांना प्रथम या सरकारांत स्थान मिळालें नाहीं. नंतर साम्राज्य-वादी लॉर्ड वेव्हेल व प्रतिगामी संस्थानिक यांनीं कारवाई करून लीगला हंगामी राष्ट्रीय सरकारांत तर आणलें! लीग हंगामी सरकारांत आली याचा अर्थच असा झाला कीं लीग घटनापरिषदेंतहि भाग घेणार; तरीपण घटनापरिषद-बहिष्काराचा मुंबई-ठराव लीगनें मागें घेतला नव्हता. ९ डिसेंबरला सुरु झालेल्या घटनापरिषदेंत लीगनें सहकार केलेला नाहीं. लीगनें सहकार करावा म्हणून ब्रिटिशांची धडपड सुरू होतीच. त्यांनीं त्यासाठीं लंडनला तांतडीनें पं. नेहरू व सरदार बलदेवसिंग यांना बोलाविलें; केवळ शिष्टाचार म्हणून ते दोघेहि गेले. पण लीग-साम्राज्यशाही डावपेंचामुळें वाटाघाटी फिसकटल्या. आतां घटनासामिती सुरु आहे; आणि लीगचा तर तीवर बहिष्कार! मग यांतून एकच मार्ग आणि तो म्हणजे हंगामी सरकारांतून 'लीगची हकालपट्टी करणें. लीगची हकालपट्टी करण्यास ब्रिटिश साम्राज्यवाद्यांनीं विरोध केल्यास इतिहास आपल्या मार्गदर्शनार्थ उभा आहे. फ्रान्सच्या स्टेटस् जनरलप्रमाणें भरलेली ही घटनासमितीच जनता सामर्थ्याच्या बळावर स्वतंत्र व सार्वभौम हिंदी लोकराज्याची घोषणा करील व मुस्लिमलीग व ब्रिटिश साम्राज्यशाही या प्रतिगामी शक्तीविरुद्ध एक स्वतंत्र राष्ट्र म्हणून जरूर तर युद्ध पुकारील.

या हंगामी सरकारचें भवितव्य इतर कोणावरहि नसून हंगामी सरकार-मागची खरी शक्ति जी हिंदी जनता तिच्यावरच अवलंबून आहे. कायद्यानें कोणतेंहि स्थान मिळालें असलें तरी कायद्यानें मिळालेले अधिकार टिकविण्यास ज्याप्रमाणें मनगटांत जोर लागतो त्याप्रमाणें हिरावून घेतलेले अधिकार

परत मिळवून त्यांस असलेला कायद्याचा आधार सिद्ध करण्यासहि मनगटांतच जोर लागतो.

सरदार पटेल यांनीं म्हटल्याप्रमाणें आतां हें हंगामी सरकार मोडण्याचा प्रश्नच नाहीं. हंगामी सरकार मोडलें तर हिंदी राष्ट्रवादाचें कंबरडेंच मोडलें म्हणून समजण्यास हरकत नाहीं; पण हिंदी राष्ट्रवाद आतां लेचापेचा राहिला नाहीं. आज १५० वर्षें हिंदी जनतेनें सोसलेली गुलामगिरी दृढ करण्यासाठीं हें हंगामी राष्ट्रीय सरकार बनलेलें नाहीं खास !

गोपालनिवास,<br>
लक्ष्मीरोड, पुणें २<br>
१६।१२।१९४६

—रा. वि. पाटणकर

# कॉंटिनेंटल प्रकाशनचीं आगामी पुस्तकें

**श्री. द. र. कवठेकर**

हा आमचा संसार

विनंति विशेष

गुन्हा

श्री.

**श्री. ना. धों. ताम्हनकर**

कोळशाची भट्टी

सावटांतलं रोप

तो.

**श्री. गोपीनाथ तळवलकर**

आनंदभुवन

शांतिनिकेतन

**श्री. अरविंद गोखले**

जन्मखुणा

शाल

**श्री. ना. ह. आपटे**

कोणी एक प्राध्यापक !

**श्री. य. गो. जोशी**

हात न काढ !

**श्री. माडखोलकर**

? ? ( कादंबरी )

**' कुसुमाग्रज '**

कल्पनेच्या तीरावर

**' रामतनय '**

प्रमिला बेन

**श्री. वि. वि. बोकील**

' वसंताच्या लीला '

अरविंद शेखमहंमद

**श्री. चिं. वि. जोशी**

आमचा पण गांव

**श्री. रा. वि. फडतरे**

तिसरी झेप

**प्रो. नारायणराव नंदापूरकर**

माय बोलीची कहाणी

**' मनमोहन '**

युगायुगांचे सहप्रवासी

**रमाकांत**

भूक ( दु. आ. )

**शांता शेळके**

वर्षा

१ : :

# नव्या मनूचा उदय

★ ★ ★

ता. २ सप्टेंबर १९४६ हा दिवस म्हणजे हिंदी इतिहासांतील नव्या युगाची सुरुवात आहे. या दिवशीं जनतेचें खरें प्रातिनिधिक सरकार हिंदी इतिहासांत पहिल्या प्रथम स्थापन झालें.

या देशांत प्लासीच्या लढाईपासून ज्या नव्या साम्राज्यशाही संस्कृतीनें धिंगाणा घातला होता ती आसुरी संस्कृति १८५७ च्या स्वातंत्र्य युद्धापासून सुरू झालेल्या व नंतर गांधीजींच्या अहिंसात्मक कार्यक्रमाचा अवलंब केलेल्या भारतीय राष्ट्रवादाशीं तडजोड करण्यास सिद्ध झाली आहे. १८५७ सालीं सुरू झालेला आमचा स्वातंत्र्यलढा हंगामी सरकारच्या स्थापनेमुळें संपला नसला, आमचें संपूर्ण स्वातंत्र्याचें ध्येय साध्य झालें नसलें, तरी भारतीय स्वातंत्र्य लढ्याचे इतिहासांत एक महत्त्वाचा टप्पा निश्चितपणें गांठला आहे.

★ ★ ★

# आपलें राष्ट्रीय सरकार

★ ★ ★

ता २ सप्टेंबर रोजीं हंगामी सरकार स्थापन झालें तें ब्रिटिशांची घटनासमितीची ता. १६ मेची घोषणा मान्य असलेल्या लीगेतर पक्षीयांचें. त्यांत कॉंग्रेसचे सात सभासद होते. पं. नेहरूंनीं हें मंत्रिमंडळ बनवितांना "आम्ही संयुक्त जबाबदारीनेंच मंत्रिमंडळ म्हणून देशाचा कारभार हांकणार आहोंत" असें जाहीर केलें होतें. या सरकारला मुस्लिम लीगचा विरोध होता व मुंबई ठरावाप्रमाणें प्रत्यक्ष प्रतिकाराचीही लीगची घोषणा होती.

लीगनें आपलें राजकीय उद्दिष्ट साधण्यासाठीं लढ्याच्या धमक्या देऊन विषारी प्रचारानें हीन जातीय दंग्यांना ठिकठिकाणीं सुरुवात केली.

देशांत या महत्त्वाच्या क्षणीं जातीय दंगे होऊन आपलें लक्ष द्विधा होऊं नये व हंगामी सरकार जनतेंतील सर्व शक्तींचें प्रातिनिधिक असावें म्हणून पंडित नेहरूंनीं ज. जीनांशीं समेट घडवून आणून त्यांचें सहकार्य मिळविण्याचा आटोकाट प्रयत्न केला. पण लीगच्या आडमुठे-पणामुळें तो फसला; मग लोकशाहीच्या तत्त्वावर आधारलेलें असें लीगेतर पक्षीयांचें सरकार स्थापन होऊन देशाचा स्वातंत्र्यलढा आंतून व बाहेरून असा दोन्ही आघाड्यांवरून सुरू झाला.

## साम्राज्यवाद्यांची कारवाई

देशाचें सरकार कॉंग्रेसच्या अधिपत्याखालीं प्रस्थापित होऊन तें एक-जिनसी होणार अशी भीति निर्माण होतांच प्रतिगामी साम्राज्यवाद्यांना धडकीच भरली.

हें सरकार स्थापन करण्याची मनीषा मंत्रिशिष्टांनीं घोषित केली त्यावेळींच या सरकारला इतर वासाहतिक सरकारांप्रमाणेंच लेखिलें.

★ ★ ★

क्रम ... आ ... दि ...

★ ★ ★

जाईल असा निर्वाळा त्यांनीं दिला होता. व्हाइसरॉयनीं आपल्या ता. ३० मेच्या पत्रांत या सरकारला रोजच्या कारभारांत जास्तींत जास्त स्वातंत्र्य देण्याची घोषणाही केली होती व मंत्रिमंडळ बनविल्याची घोषणा झाली त्यावेळींहि तिचा पुनरुच्चार करण्यांत आला होता.

या आश्वासनांमुळें हंगामी सरकार कायदेशीरपणें वसाहतींच्या दर्जाचें नसलें तरी प्रत्यक्ष व्यवहारांत त्याचा दर्जा कमी नव्हता हें स्पष्ट झालें होतें.

कोणत्याही एका अल्पसंख्यांक पक्षाच्या दुराग्रहानें देशाची प्रगति अडून बसणार नाहीं हें पंतप्रधान अॅटलींचें आश्वासन खरें होणार अशी आशाही उत्पन्न झाली आहे. पण प्रतिगामी साम्राज्यवाद्यांना यामुळें बेचैन केलें. त्यांनीं कॉंग्रेस सरकारांत अडथळे निर्माण करण्याची कोशीस चालविली. कॉंग्रेस-लीग समझौता दोन्ही पक्षांच्या अध्वर्यूंस अशक्य वाटला; पण साम्राज्यवाद्यांनीं भोपाळच्या नबाबामार्फत तो घडवून आणण्याचा ( आणण्याचा कसला ? तो आला आहे असा आभास निर्माण करण्याचा डाव रचला ! ) दिल्लींत ऑक्टोबरचे पहिले दोन आठवडे निरर्थक वाटाघाटी झाल्या. कॉंग्रेस-लीग समन्वय न होतां लीग मात्र हंगामी मंत्रिमंडळांत आली.

लीगनें व्हाइसरॉयच्या २४ ऑगस्टच्या नभोवाणीवरील घोषणेचा आधार घेतला. त्यांत व्हाइसरॉयनें लीगसाठीं ५ जागा मंत्रिमंडळांत केव्हांही मोकळ्या आहेत असें आश्वासन दिलें होतें.

कॉंग्रेस व लीग यांच्यांत सलोखा निर्माण न होतांच नव्या हंगामी राष्ट्रीय सरकारला व्हाइसरॉयच्या जुन्या कार्यकारिणीचें रूप देण्याचा

★ ★ ★

★ ★ ★

संकल्प करून लीगनें २६ ऑक्टोबरला या राष्ट्रीय मंत्रिमंडळांतील पांच जागा घेतल्या.

लीगचा मंत्रिमंडळ प्रवेश योग्य त्या कॉँग्रेस-लीग समझौत्यानंतर होता तर त्याचे जनतेनें स्वागतच केलें असतें. हंगामी सरकारांत लीगनें प्रवेश केला तो अशा समझौत्यानें नव्हे. शिवाय हें हंगामी सरकार स्थापन झालें तें घटनासमितीमार्फत स्वतंत्र हिंदी घटना तयार करण्याचें कार्य सुलभ व्हावें म्हणून. पण लीगनें मंत्रिमंडळांत प्रवेश करतांना आपल्या कुप्रसिद्ध मुंबई ठरावाला मूठमाती दिली नाहीं.

श्री. गजनाफर अलीखानांसारख्या लीग मंत्र्यांचीं वक्तव्येंहि निराशाजनक आहेत. ते म्हणतात, "आम्ही आतां कांहीं झालें तरी आमच्या जागा सोडणार नाहीं आमचेशीं सहकार्य करणें कॉँग्रेसला अशक्य झालें तर त्यांनीं अधिकारत्याग करावा* "

यावरून लीग कॉँग्रेसशीं सहकार्य करणार नाहींसें दिसतें.

## अंतिम यशाची खात्री

कॉँग्रेसच्या राष्ट्रवादी व पुरोगामी कारभारास कांहीं खीळ घालतां आल्यास पहावें म्हणून ही साम्राज्यशाही-लीग युति झाली. पण आतां काळ बदलला आहे. या प्रतिगाम्यांच्या कारवायांस न जुमानतां आपणांस पुढें नेण्यास मिळालेली सत्ता समर्थ आहे. कॉँग्रेसतर्फे मंत्रिमंडळांत

---

* "Come what may, we won't walk out of office. Let the Congress quit if it cannot work with us."

—Ghazanafar Ali

★ ★ ★

★ ★ ★

पंडितजींसारखे आंतरराष्ट्रीय कीर्तीचे नेते आहेत त्यामुळें भविष्यकाळाबद्दल निश्चित राहण्यास हरकत नाहीं.

लीगनें मंत्रिमंडळांत प्रवेश केल्यानें संयुक्त जबाबदारीस बाध येईल. तरी पण निर्माण होणारी जबाबदारी वैयक्तिक राहणार नाहीं. आतां मंत्रिमंडळांत कॉंग्रेस मंत्र्यांचा गट, लीग मंत्र्यांचा गट व कॉंग्रेसशीं सहमत असलेला अल्पसंख्याकांचा गट असे तीन गट राहतील. त्यांतील कॉंग्रेस व लीग हेच गट महत्त्वाचे व त्या गटापैकीं कोणाहि एका मंत्र्याचा व्हाइसरॉयशीं मतभेद झाला तरी किमान तो सबंध गट तरी मंत्रिमंडळांतून जाईल. आतां सबंध मंत्रिमंडळाची संयुक्त जबाबदारी जाऊन त्यांतील गटांची संयुक्त जबाबदारी राहिली आहे.

व्हाइसरॉयच्या आश्वासनामुळें हें सरकार कायद्याच्या भाषेंत जरीं १९१९ च्या घटनेप्रमाणेंच स्थापन झालें असलें तरी खऱ्या अर्थानें तें राष्ट्रीय सरकारच आहे. या मंत्रिमंडळांत प्रथमच सर्व मंत्री हिंदी आहेत व तेही आमच्या निरनिराळ्या लोकपक्षांचे लोकप्रिय पुढारी आहेत.

लीगनें आपला आडमुठेपणा सोडला व देशाच्या स्वातंत्र्यलढ्यांत कॉंग्रेसला विरोध न करण्याचें धोरण स्वीकारलें तर आजवरच्या आपल्या स्वातंत्र्यलढ्यास आलेल्या या मोहोरापासून आपल्यास ' स्वातंत्र्यरुपी ' मधुर आम्रफल नव्या लढ्याशिवाय मिळेल.

## शेवटचा टप्पा

आज आपली काय निश्चित प्रगति झाली आहे हें समजण्यासाठीं आपण कोठून निघालों हें पाहिलें पाहिजे. १८५७ च्या अयशस्वी स्वातंत्र्य-

★ ★ ★

# आपलें राष्ट्रीय सरकार

★ ★ ★

युद्धापासून आपण हा आपल्या स्वातंत्र्याच्या मार्गावरील अगदीं शेवटचा टप्पा गांठला आहे. आतां आपण स्वातंत्र्याच्या दारांत आहोंत. एकच दणका दिला कीं दारें उघडतील. हंगामी राष्ट्रीय सरकारामुळें नव्या मनूचा उदय झाला आहे हें पटण्यासाठीं आपल्या आजवरच्या स्वातंत्र्यपथाच्या निरीक्षणाची जरूरी आहे.

★ ★ ★

## २ : : कंपनीकडून शाही सत्तेकडे

★ ★ ★

ब्रिटिश सत्तेबरोबर नवी राज्यघटना, नवी शिक्षण पद्धति नवी संस्कृति येथें सजविण्याचा प्रयत्न करण्यांत आला. आजपर्यंत आपणांवर चालू असलेली राजवटही आपल्या इच्छेप्रमाणें नसून आपणांवर ब्रिटिशांनीं लादलेली आहे.

पाश्चिमात्य संस्कृतीस आपण नवीन असल्यामुळें साहजीकच पहिला कांहीं काळ आपल्या देशांत मोठ्या विस्मयाचा असा गेला. ब्रिटिशांची हुशारी, ब्रिटिशांची राजकारणपटुता, त्यांची शिक्षण पद्धति, नवें ज्ञान व त्यानंतर त्यांनीं दिलेली मोठ्या पगाराची नौकरी वगैरे सर्वच गोष्टी अपूर्वाईच्या वाटल्या. त्यावेळीं एक दोन पिढ्या ब्रिटिशांच्या कर्तुमकर्तुम् शक्तीपुढें दिपून गेल्यासारख्या झाल्या होत्या, भारल्या गेल्या होत्या.

★ ★ ★

# आपलें राष्ट्रीय सरकार

★ ★ ★

ब्रिटिश सरकारची राजवट सुरू होईपर्यंतच्या काळांत हिंदी लोकांस थोडथोडें परिस्थितीचें आकलन होऊं लागलें होतें, इतकेंच नव्हे तर अस्तंगत होत असलेल्या स्थानिक सत्ताधीशांस आपल्या अगतिकपणाची जाणीवही झालेली होती. कारण १८५७ सालचें स्वातंत्र्य युद्ध त्या शूर पुरुषांनीं पुकारलेलें अखेरचेंच पण अयशस्वी बंड ठरलें. यानंतर हिंदी इतिहासांत जुन्या राजसत्तेनें स्वत: अगर इतर कोणामार्फत तिच्या पुनरुत्थानासाठीं सशस्त्र बंड पुकारलें नाहीं.

## चार काल खंड

(१) ब्रिटिश राजवटीच्या अभ्यासासाठीं सोयीच्या दृष्टीनें इतिहासकारांनीं जे कालखंड कल्पिले आहेत त्यांतील पहिला कालखंड ईस्ट इंडिया कंपनीच्या स्थापनेपासून १८५७ पर्यंतचा आहे.

(२) हिंदुस्थान ब्रिटिश साम्राज्यांतील मुकुटमणि होऊन हिंदुस्थानचा कारभार इंग्लंडच्या पार्लमेंटचे मताप्रमाणें गव्हर्नर जनरल व व्हाइसरॉय यांचे मार्फत सुरू झाल्यापासून १९१९ च्या सुधारणा कायद्यापर्यंतच्या कालाची दुसऱ्या कालखंडांत गणना केलेली आहे. या काळांत ब्रिटिश राजवटीचें अंतिम ध्येय हिंदुस्थानला जबाबदारीचें साम्राज्यांतर्गत राज्य देण्याचें असल्याचें निश्चित झालें. १८५७ पासून हिंदी लोकांनी मोठा धडा घेतला. यानंतर पुढारलेल्या ब्रिटिश राजवटीशीं लढा देण्यासाठीं नवीन पद्धतीनें लढा देण्याची आवश्यकता हिंदी लोकांस पटून नव्या लोक जागृतीचा उदय झाला. पाश्चिमात्य शिक्षणानें सुसंस्कृत झालेल्या नव्या पिढीकडे देशांतील राजकीय व सामाजिक चळवळींचें नेतृत्व जाऊन पाश्चिमात्य पद्धतीच्या लोकशाही स्वातंत्र्याची मागणी करण्यापर्यंत हिंदी लोकांची मजल गेली.

★ ★ ★

★ ★ ★

(३) १९१९च्या सुधारणा कायद्यापासून तो तहत १९४० पर्यंतचा एक कालखंड अभ्यासाचे सोयीसाठीं पाडण्यांत आला आहे. या कालखंडांत वसाहतींचें स्वराज्य हें हिंदी सुधारणांचें अंतिम ध्येय असल्याचें जाहीर झालें. वेस्ट मिनिस्टरच्या कायद्याचें वसाहतींचें स्वराज्य आम्हांस पाहिजे अशी आमची मागणी होती, पण ब्रिटिश मुत्सद्दी मात्र तसें स्पष्ट करण्यास तयार नव्हते.

(४) १० जानेवारी १९४० ला त्या वेळचे हिंदुस्थानचे व्हाइसरॉय लॉर्ड लिनलिथगो यांनीं 'हिंदुस्थानला वेस्ट मिनिस्टर कायद्याचेंच वसाहतींचें स्वराज्य देण्याचा सरकारचा मानस' असल्याचें जाहीर करून नव्या कालखंडास सुरुवात केली. पण यावेळीं आम्ही पुढील तारखेवरच्या स्वातंत्र्याच्या हुंडीवर समाधान मानण्यास तयार नव्हतों. सुरू झालेल्या जागतिक युद्धांत ब्रिटनला हिंदी लोकांचें कळकळीचें सहकार्य पाहिजे होतें. हिंदुस्थाननें जर्मनीविरुद्ध अधिकृतपणें युद्ध पुकारून तें मिळत नव्हतें. सरकारी युद्धघोषणा ब्रिटनच्या मर्जीप्रमाणें झालेली होती, पण ब्रिटिशांस पाहिजे होतें तें यामुळें साध्य होत नव्हतें. युद्धोत्तर काळांत हिंदुस्थानला स्वातंत्र्य देण्यांत येईल अशी अधिकृत ब्रिटिश घोषणा व ताबडतोब हंगामी राष्ट्रीय सरकारची स्थापना झाली असती तरच हिंदी जनतेचें खरेखुरें सहाय्य ब्रिटिशांना मिळालें असतें.

या कालखंडांत जसजसें युद्ध भीषण होत होतें, तसतसा हिंदी परिस्थितींत झपाट्यानें फरक होत होता. जपानी दाराशीं येतांच ब्रिटिशांनीं सर स्टॅफर्ड क्रिप्स यांना शिष्टाईसाठीं हिंदुस्थानांत पाठविलें. शिष्टाई फोल ठरून कॉंग्रेसच्या नेतृत्वाखालीं १९४२ चा क्रांतिलढा झाला. त्यांतील घोषवाक्य ( क्विट इंडिया ) हें साध्य झालें नसलें तरी या लढ्यानें

★ ★ ★

# आपलें राष्ट्रीय सरकार

★ ★ ★

१८५७ नंतर प्रथमच प्रचंड देशव्यापी क्रांति झाली. जनतेच्या सामर्थ्याची व संघटना-कुशलतेची कसोटी लागली.

युद्धोत्तर काळांत ब्रिटिश सुलतानी राजवट चालणें अशक्य आहे हें साम्राज्य सरकारनें ओळखलें व १४ जून १९४५ मध्यें कॉंग्रेस वर्किंग कमिटीच्या सभासदांची मुक्तता करून नवे व्हाइसरॉय लॉर्ड वेव्हेल यांनीं जुन्या व्हाइसरॉयांनी सुरू केलेला पेंचप्रसंग निवारण करण्यासाठीं ऑगस्ट-मध्यें अयशस्वी प्रयत्न केला. हिंदी जनतेचें वाढलेलें सामर्थ्य, ब्रिटनचे आंतरराष्ट्रीय पतींत युद्धामुळें झालेली घट, बदललेली आंतरराष्ट्रीय स्थिति व इंग्लंडमध्यें आलेलें नवें मजूर सरकार यांमुळें हिंदी जनतेचा प्रश्न समाधानकारकरीतीनें सोडविणें अगत्याचें ठरल्यानें ब्रिटन मार्फत सतत प्रयत्न सुरू होते. हिंदी जनतेसही स्वातंत्र्य पाहिजेच असल्यानें व लढ्यानंतर तें तडजोडीनें मिळण्याची शक्यता दिसल्यानेंच हिंदी जनतेतर्फे कॉंग्रेसनें या नव्या सरकारांत भाग घेतला आहे.

या व पुढील तीन प्रकरणांवरून हिंदुस्थानच्या इतिहासांतील या चार कालखंडांत झालेल्या राजकीय सुधारणांचा व हिंदी लोकांच्या वाढत्या आकांक्षांचा सुसंगत विचार करून या सर्व सुधारणा ब्रिटिश साम्राज्य-शाहीनें हिंदी लोकांच्या स्वातंत्र्य लढ्यानंतर हिंदी असंतोष टाळण्या-साठीं पण उशीरां केलेले प्रयत्न आहेत हें दिसून येईल.

## व्यापारी राजकारणांत शिरले

हिंदुस्थानांत ब्रिटिश सत्ता अभावितपणेंच स्थापली गेली. इतकी

★ ★ ★

★ ★ ★

मोठी गोष्ट अभावितपणें व अनपेक्षितपणें इंग्रजानीं केल्याचें दुसरें उदाहरण ब्रिटिश इतिहासांत सांपडणार नाहीं.*

कंपनीच्या राजवटींतील पहिल्या कालखंडाच्या पूर्वार्धांत (इ. स. १७६५ पर्यंत) कंपनी केवळ एक व्यापारी मंडली म्हणूनच काम करीत होती. इ. स. १६०० मध्यें एलिझाबेथ राणीकडून व्यापाराची सनद मिळवून पूर्वेकडे मसाल्याच्या बेटांशीं व सुवर्णभूमीशीं व्यापार करण्याकरितां स्थापन झालेली ईस्टइंडिया कंपनी एकेकाळीं संस्कृतीच्या उच्च शिखरावर असलेल्या हिंदुस्थानांत आपला अंमल अवघ्या १५० वर्षांत बसवूं शकली. ईस्टइंडिया कंपनीनें स्पॅनिश व डच व्यापारी कंपन्यांच्या चुकांपासून धडा घेतला व जवळजवळ पहिलीं १०० वर्षें हिंदी परिस्थितीच्या सूक्ष्म अभ्यासांत व केवळ व्यापारवृद्धींत घालविलीं. या काळांत त्यांनीं हिंदुस्थानच्या भूप्रदेशावर आपल्या वखारी स्थापण्यापलीकडे राज्यविस्ताराची हांव धरली नाहीं. त्यांचा बहुतेक वेळ प्रतिस्पर्धी फ्रेंच व पोर्तुगीज व्यापारी कंपन्यांशीं सामना देण्यांतच गेला. अठराव्या शतकाच्या प्रथमार्धांत फ्रेंच कंपनीतील महत्त्वाकांक्षी डुप्लेनें देशी राजकारणांत लक्ष घालून एतद्देशीय राजांच्या वारसाच्या भांडणांत पडून आपणांस सवलती मिळविण्याचा उपक्रम सुरू केला. त्यासाठीं त्यानें कवायतीचें शिक्षण देऊन हिंदी पलटणी तयार केल्या. नव्या शिक्षित हिंदी पलटणींचा प्रभाव पडूं लागल्यानें फ्रेंच

---

"Our acquisition of India was made blindly. Nothing great that has ever been done by Englishmen was done so unintentionaly, so accidentaly, as the conquest of India"

Sir John Seeley.

✶ ✶ ✶

★ ★ ★

लोक दक्षिण हिंदुस्थानांत एक मातबर प्रस्थच होऊन बसले. पण इंग्लिशांस क्लाइव्ह हा धडाडीचा गृहस्थ भेटल्यानेंच तंजावरांतून व पर्यायानें सबंध हिंदुस्थानांतून फ्रेंचांचें निर्मूलन झालें.

## क्लाइव्हला बंगालची दिवाणी

मोंगल बादशाही खंबीर असतांना औरंगजेबाचे अमदानींत ब्रिटिशांनीं बादशाहीशीं लढा देण्याचा बेत केला होता. पण औरंगजेबानें त्यांस कडक शासन केल्यानें मोंगल बादशाहीचा अस्त होईपर्यंत त्यांनीं बंगालमध्यें पुन्हा डोकें वर काढलें नाहीं.

मात्र १७३९ नंतर मीरकासीम व सिराज यांचेशीं कटकटी सुरू करण्यास त्यांनीं कमी केलें नाहीं. त्यासाठीं इंग्लिशांनीं कृष्ण कारस्थानें रचलीं. उमीचंदासारखे देशबुडवे गांठले व शेवटीं त्यांचाही निकाल लावला आणि प्लासीच्या लढाईनंतर अलाहाबादच्या तहानें हिंदुस्थानच्या राज्यकारभारांत आपला प्रत्यक्ष शिरकाव करून घेतला. या तहान्वयें कंपनीस बंगाल बिहार व ओव्ह्या या प्रांतांची दिवाणी क्लाइव्हनें मिळवली. येथपासून ब्रिटिश राजवटीस हिंदुस्थानांत सुरुवात झाली असें म्हणतां येईल. यापूर्वी कंपनी फक्त हिंदी राजकरणांत व्यापारवृद्धीसाठीं भाग घेत असे. इंग्लिश साम्राज्याचा पाया क्लाइव्हनेंच घातला.

## कंपनीनें कर्जासाठीं सत्ता विकली

कंपनीचें राजकीय सत्तेंत होणारें रूपांतर पार्लमेंटला साहजीकच पाहववलें नाहीं; कंपनीचे कारभारांत आपणांस स्थान असावें असें पार्लमेंटला वाटत होतें. फक्त तशा संधीचीच पार्लमेंट वाट पहात होतें.

★ ★ ★

★ ★ ★

कंपनीच्या अधिकाऱ्यांची लांचखाऊ वृत्ति, कंपनीचा अनागोंदी कारभार, बंगालमधील १७७० चा दुष्काळ या कारणांनीं कंपनीची आर्थिक स्थिति खालावली आणि पार्लमेंटकडे तिनें ब्रिटिश सरकारला वार्षिक द्यावयाच्या रकमेची सूट मागितली व शिवाय कर्जही मागितलें. कंपनीला कर्ज देण्यापूर्वी तिच्या कारभारावर नियंत्रण घातलें. हा नियंत्रक कायदा रेग्युलेटिंग ॲक्ट ( १७७२ ) या नांवानें ओळखला जातो.

हा कायदा होण्यापूर्वी कंपनीच्या कलकत्ता, मुंबई व मद्रास येथील मुख्य वखारींच्या व्यवस्थापकांकडे त्या त्या प्रांतांतील वखारींचें व ब्रिटिश मालमत्तेचें संरक्षण करण्याचें काम असे. या प्रत्येक प्रमुख वखारीवर एक गव्हर्नर ( अध्यक्ष ) असे. प्रत्येक गव्हर्नरचे मदतीस एक छोटें कार्यकारी मंडळ दिलें होतें. कार्यकारी मंडळ व गव्हर्नर यांच्या बहुमतानें कारभार चाले. या मंडळाचें मुख्य कार्य म्हणजे आपल्या अधिकाराखालील वखारींचा कारभार किफायतशीर करणें व कंपनीच्या नोकरांच्या सुखसोयी पाहणें. शिवाय कंपनीनें आपल्या वखारींच्या शहरीं आपल्या वसाहती स्थापल्या होत्या. त्यांतील नागरी कारभारही त्यांचेकडेच होता. तिन्ही ठिकाणचे गव्हर्नर फक्त कंपनीलाच जबाबदार होते. या तिन्ही गव्हर्नरांचे कारभारांत अगर धोरणांत एकसूत्रीपणा नव्हता. कंपनीला व कंपनीमार्फत ब्रिटिश पार्लमेंटला साम्राज्यलालसा उत्पन्न झाली तेव्हां या तिन्ही गव्हर्नरांचा एकसूत्री कारभार चालणें आवश्यक झालें. बंगालच्या दिवाणीमुळें ब्रिटिश मुलखांत कलकत्याच्या गव्हर्नरलाच महत्त्व आलें होतें; म्हणून रेग्युलेटिंग कायद्यानें कलकत्याच्या गव्हर्नरला बंगालचा गव्हर्नर जनरल हा हुद्दा देऊन त्याची हिंदुस्थानांतील इतर गव्हर्नर्सवर हुकमत चालावी

★ ★ ★

★ ★ ★

असें ठरलें. त्याच्या मदतीस ४ सभासदांचें कौन्सिल देण्यांत येऊन कौन्सिलच्या बहुमतानें ग॰ ज.नें कारभार हांकावा असें ठरलें. कलकत्ता येथें एक वरिष्ठ न्यायकोर्ट स्थापण्याचें ठरलें. महत्त्वाचे कागदपत्र डायरेक्टरांनीं ब्रिटिश प्रधानांकडे पाठविण्याचें कबूल केलें. शिवाय कंपनीच्या भागीदारांच्या व नियामकांच्या घटनेंत बदल करण्यांत आले.

कंपनीनें ब्रिटिश सरकारला द्यावयाची वार्षिक रक्कम रद्द करण्यांत आली व कंपनीस १४ लक्ष पौंड कर्ज मिळालें.

रेग्युलेटिंग कायद्यानें ब्रिटिश पार्लमेंटनें हिंदुस्थानांतील कंपनीचा कारभार नियंत्रित करून कंपनीचें हिंदुस्थानांतील राजकारण पार्लमेंटचे देखरेखीखालीं आणलें. कंपनीची आर्थिक गरज भागली पण तिच्यावरील राजसत्तेची पकड वाढली.

बंगालचा गव्हर्नर जनरलच पुढें क्रमाक्रमानें गव्हर्नर जनरल व व्हाइसरॉय झाला व ४ जणांच्या कौन्सिलचा विकास होऊनच आजचें हंगामी राष्ट्रीय सरकार स्थापन झालें आहे.

## ब्रिटिश पार्लमेंटची हुकुमत वाढली.

बोर्ड ऑफ कंट्रोलची स्थापना करून त्याचा ताबा कंपनीच्या डायरेक्टर बोर्डाचे धोरणावर चालावा असें ठरवून पिटच्या इंडिया बिलानें कंपनीचें हिंदुस्थानांतील राज्ययंत्र पार्लमेंटच्या अधिकच अंमलाखालीं आणलें.

कमिशनर्स फॉर द अफेअर्स ऑफ इंडिया ( हिंदी व्यवहारासाठीं कमिशनर्स) ऊर्फ बोर्ड ऑफ ट्रेड हें सरकारी खातें असून त्यांतील पांचही

★ ★ ★

★ ★ ★

सभासद प्रीव्ही कौन्सिलर्स असत. यांपैकीं एक अर्थमंत्री व दोन इतर मंत्री असल्याचें व त्यांचेच सल्ल्यानें हिंदुस्थानांतील कंपनीचा कारभार चालणार असल्यानें या कायद्यानें हिंदी मुलुखावर ब्रिटिश पार्लमेंटची सत्ता जवळजवळ प्रस्थापित केली. याच कायद्यानें गव्हर्नर जनरलचें कौन्सिल ४ ऐवजीं ३ सभासदांचें करण्यांत आलें. व प्रांतिक गव्हर्नरांची कौन्सिलेंही बदलण्यांत आलीं.

## गव्हर्नर जनरलला अनियंत्रित सत्ता

कंपनीस दिलेली सनद १७९३ सालीं संपल्यानें या वर्षी कंपनीस वीस वर्षांसाठीं व्यापाराची मुखत्यारी देण्यांत आली. याचबरोबर कंपनीची राजकीय सत्ता मर्यादित करण्यांतहि आली. कंपनीच्या डायरेक्टर बोर्डानें गव्हर्नर व सेनापती यांच्या केलेल्या नेमणुकांस सरकारची संमति लागूं लागली. महत्त्वाच्या प्रश्नांवर व विशेषतः ज्यांत हिंदुस्थानांतील ब्रिटिश मुलुखाची शांतता, सुरक्षितता व कंपनीचे हितसंबंध यांविषयींचे प्रश्नांवर गव्हर्नर जनरलला आपले कौन्सिलचे बहुमताविरुद्ध वेळ पडल्यास वागण्याची मुभा देण्यांत आली. गव्हर्नर जनरलचे अधिकार वाढविण्यांत येऊन त्यास हिंदुस्थानांतील राजांशीं तह व करारनामे करण्याची मुभा देण्यांत आली.

## कंपनीच्या व्यापारी सवलतींना कात्री

कंपनीला दिलेली व्यापारी सनद संपण्यापूर्वी ब्रिटिश पार्लमेंट हिंदी परिस्थिति अभ्यासण्यासाठीं एक चौकशी कमिटि नेमूं लागलें. १८१२ सालीं अशा कमिटीचा अहवाल मिळाल्यानंतरच पार्लमेंटनें १८१३ सालीं

★ ★ ★

★ ★ ★

दुसरा चॅर्टर कायदा केला. या कायद्यानें कंपनीची हिंदी व्यापारांतील मुखत्यारी फक्त चहाच्या व्यापारापुरतीच मर्यादित करण्यांत आली.

हिंदुस्थानांतील कंपनीचा मुलूख हा ब्रिटनच्या राजासाठीं कंपनीनें कारभारासाठीं आपणांकडे ठेवावा असें ठरलें. म्हणजे आतां कंपनी हिंदी कारभार पार्लमेंटतर्फे पहाणार असें ठरलें. कंपनीच्या व्यापारविषयक सर्व सवलती रद्द करण्यांत येऊन तिला व्यापारविषयक कारभार बंद करण्यास सांगण्यांत आलें. कंपनीच्या डायरेक्टरबोर्डाला कोणतेही हुकूम परस्पर हिंदुस्थानांत पाठविण्याची मनाई करण्यांत आली.

कंपनीच्या भागीदारांस त्यांच्या हिश्श्याची सर्व रक्कम चाळीस वर्षांत परत करण्याची योजनाही आंखण्यांत आली.

## कंपनीच्या कारभारांत हिंदी लोकांस स्थान

बंगालच्या गव्हर्नर जनरलला हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल संबोधण्यांत येऊं लागलें. गव्हर्नर जनरलच्या कार्यकारिणीवर चौथ्या सभासदाची नेमणूक करण्यांत आली. त्याचें नांव कायदामंत्री. या सभासदांस फक्त कायदेविषयक प्रश्नांवरच मतदान करण्याचा अधिकार देण्यांत आला. देशांत कायदेकानू करण्यासाठीं एक कमिशन नेमण्याचें ठरलें. पहिले लॉ मेंबर श्री. मेकॉले यांचे अध्यक्षतेखालीं हें कमिशन काम करीत होतें.

या कायद्यांतील सर्वांत महत्वाचें कलम म्हणजे हिंदी लोकांस कोणत्याहि मोठ्या हुद्याच्या जागयावर नेमण्याविरुद्ध असलेली हरकत रद्द करण्यांत आली.

★ ★ ★

★ ★ ★

या कायद्यानें सर्व हिंदुस्थानसाठीं कायदे करण्याची जबाबदारी गव्हर्नर जनरल व त्यांचें कार्यकारी मंडळ यांचेवर सोंपविण्यांत आली व कायदेकानूंबाबत सर्व ब्रिटिश हिंदुस्थानांत एकवाक्यता व सुसूत्रता राहण्याची तजवीज झाली. या घटनेनें भावी मध्यवर्ति विधिमंडळाचा पाया घातला.

## कंपनीला नोटीस

१८५३ सालीं संपलेली कारभार पहाण्याची कंपनीची सनद त्या सालच्या चार्टर कायद्यानें वाढविण्यांत आली. पण यावेळीं ती वीस वर्षांनीं न वाढविता फक्त पार्लमेंट सनद काढून घेईपर्यंतच वाढविण्यांत आली.

कपनीच्या कारभारावर व हक्कांवरही नियंत्रणें वाढविण्यांत आलीं. कंपनीच्या १८ डायरेक्टरांपैकीं ६ डायरेक्टरांची निवड ब्रिटिश सरकारनें करावयाची असें ठरलें. शिवाय ब्रिटिश सरकारच्या हिंदुस्थानांतील सैन्याचे सेनानींच्याच अधिपत्याखालीं कंपनीचें सैन्यही देण्यांत आलें. गव्हर्नर जनरलच्या कार्यकारिणीवरील सभासदांच्या डायरेक्टरांनीं केलेल्या नेमणुकांस सरकारची संमति आवश्यक करण्यांत आली.

## हिंदी कायदेमंडळाची बीजें

लॉ-मेंबरला इतर सभासदांचा दर्जा मिळून तो सर्व प्रश्नांवर मतदान करूं लागला व आणखी सहा सभासदांनीं कायदे करण्यासाठीं फक्त कार्यकारी मंडळांत यावें असें ठरलें. चार प्रांतांचे चार प्रतिनिधि, बंगालचे सर न्यायाधीश व बंगालच्या सुप्रीम कोर्टाचे न्यायाधीश हे ते सहा प्रतिनिधि होत. या वर्षापासून सनदी नौकरांसाठीं परीक्षा घेण्याचें

★ ★ ★



२

★ ★ ★

ठरलें. बोर्ड ऑफ कंट्रोलचा अध्यक्ष एवढा एकच सभासद कंट्रोल बोर्डावर शिल्लक राहिला. हा अध्यक्ष म्हणजेच भावी भारतमंत्री होय. पण अजून डायरेक्टरांचें काम संपलें नव्हतें. सर्व कारभार तेच पहात. बोर्ड ऑफ कंट्रोलकडे फक्त नियंत्रण होतें.

अशा प्रकारें कंपनीच्या राजवटीवर दिवसेंदिवस पार्लमेंटचें नियंत्रण वाढत चाललें होतें व कंपनीची राजवट संपुष्टांत आणण्याचें निश्चित झालें होतें. त्यासाठीं पार्लमेंट फक्त संधीचीच वाट पहात होतें ती संधि १८५७ च्या अयशस्वी स्वातंत्र्ययुद्धानें मिळाली.

## अपेशी क्रांतियुद्ध

१८५७ च्या सुरुवातीस ब्रिटिश राजवट हिंदुस्थानांत पूर्णपणें प्रस्थापित झाली होती. ब्रिटिश अंमल बसवितांना गव्हर्नर जनरलसनीं आपल्याला सोयिस्कर अशा निरनिराळ्या पद्धति स्वीकारल्या. पैकीं तैनाती फौजेची पद्धत व दत्तक घेण्याच्या राजांच्या हक्कावरील गदा हीं दोन प्रभावी हत्यारें ब्रिटिशांस सांपडलीं. ब्रिटिश राजवटीनें देशी राजे लोक त्याचे केवळ मांडलीक बनाविले. त्यांच्यांतील असंतोष वाढत गेला. पाश्चिमात्य शिक्षण, नव्या सुधारणा, राजे लोकांस दुखविण्याचें ब्रिटिश धोरण यामुळें असंतोष निर्माण झाला; त्यांतच दिल्लीचा नामधारी बादशाह बहादुरशहा यास ब्रिटिशांनीं दिल्ली सोडून जाण्याचा हुकुमी सल्ला दिला.

हिंदी सैन्यांतही शिपायांच्या धार्मिक भावना दुखविल्या गेल्यानें असंतोष वाढत होता. शिवाय त्यांच्या कर्तृत्वास वाव नसल्याचेंही त्यांस दिसत होतें. त्यांस गाय व डुकराची चरबी असलेलीं काडतुसें देण्यांत

★ ★ ★

★ ★ ★

आल्यानें त्यांच्या असंतोषाचा अग्नी भडकला. त्यांच्या धार्मिक भावना दुखविल्या गेल्या व बंडास तोंड फुटलें. पदच्युत झालेले पेशवे व बादशाह बंडांत सामील झाले. सर्वांनी पराक्रमाची कमाल केली पण ब्रिटिश सैन्यापुढें टिकाव लागला नाहीं व होणारी क्रांति दडपली गेली.

## कंपनीचें अस्तित्व संपलें

या अपेशी क्रांतीने ब्रिटिश सरकारनें मात्र धडा घेतला व हिंदुस्थानांतील लोकांस संतुष्ट राखण्याचा प्रयत्न सुरू केला. कंपनीची राजवट संपुष्टांत आली व हिंदुस्थानचा कारभार गव्हर्नर जनरलमार्फत ब्रिटिश पार्लमेंट पाहूं लागलें; मंत्रिमंडळांत भारतमंत्र्याची नवी जागा निर्माण झाली. व त्यांमार्फत पार्लमेंट कारभार चालवूं लागलें.

गव्हर्नर जनरलला राजप्रतिनिधि ( व्हाईसरॉय ) हा किताब मिळाला. व राजाचे अधिकार त्यास मिळाले.

★ ★ ★

## ३ : : नव्या भारताचा जन्म

★ ★ ★

'सर बार्टल फ्रियर यांनीं म्हटल्याप्रमाणें ज्या प्रजेजवळ तिच्यासाठीं होणारे कायदे योग्य कीं अयोग्य हें दाखविण्यास बंडाशिवाय दुसरें साधन नाहीं अशा लक्षावधि लोकांसाठीं कायदे करीत राहणें निःसंशय धोक्याचें ठरलें होतें.'*

बंडानें ब्रिटिश पार्लमेंटला जागें केलें. व पुढील काळांत ब्रिटिश राजवटीनें वरील धडा घेतला. या काळांत ब्रिटिशांनीं पाश्चिमात्य शिक्षणाचा

---

It was clearly dangerous to continue, as Sir Bartle Frere put it, to legislate for millions of people with few means of knowing except by a rebellion, whether the laws suit them or not.
R. Couplnd, Constitutional Problem in India p.21.

✶ ✶ ✶

★ ★ ★

प्रघार करून पाश्चिमात्य पद्धतीच्या राजवटींत हिंदुस्थानला थोडेंथोडें स्थान देण्याचा उपक्रम केला. या काळांत झालेली विधिमंडळाची वाढ मुख्यत्वेंकरून लोकमत कळण्याच्या दृष्टीनेंच केली गेली. लोकांस वाटेल तें बोलण्यास मुभा ठेवून त्यांच्या तक्रारींची वेळींच कल्पना यावी व असंतोषाचा एकदम भडका उडूं नये या स्वार्थी हेतूनेंच हा कार्यक्रम हातीं घेण्यांत आला होता.

## राणीचा जाहीरनामा

पार्लमेंटनें कंपनीची सत्ता हातीं आणतांना इंग्लंडच्या राणीकडून एक जाहीरनामा काढवला या राणीच्या जाहीरनाम्याची कांहीं लोक इंग्लंड-च्या मोठ्या सनदेशीं तुलना करतात पण या जाहीरनाम्यांत जमीन-अस्मानाची तफावत आहे. एकानें ब्रिटिश सरदारांनीं राजावर आपली सत्ता प्रस्थापित केली तर दुसऱ्यानें एका राष्ट्रावर खाजगी कंपनीनें केलेल्या अत्याचारांस संमति मिळून देशाच्या झालेल्या पिळणुकीला राजमान्यता मिळाली. फक्त बळकावलेला मुलुख कंपनीकडून राजसत्तेनें (पण तो परक्या राजसत्तेनें) आपल्या ताब्यांत घेतला. व तेथील प्रजेनें बंड करूं नये म्हणून कंपनीच्या काळांत जी सामाजिक अस्थिरता व अनिश्चितता निर्माण झाली होती ती राहणार नाहीं असे आश्वासन दिलें. त्या जाहीरनाम्याचा आशय असा आहे : “आतांपर्यंतचा ईस्ट इंडिया कंपनीचा हिंदुस्थानावर राज्य करण्याचा अधिकार आज आम्ही आपल्या हातीं घेतला आहे. ईस्ट इंडिया कंपनीने देशी संस्था-निकांशीं केलेले करारमदार आम्ही मानूं व देशी संस्थानिकांस त्यांच्या पूर्वीच्या इभ्रतीप्रमाणें वागविलें जाईल. धर्माच्या कार्यांत कोणावरहि

★ ★ ★

★ ★ ★

सक्ति केली जाणार नाहीं, व हिंदी लोकांचें त्यांच्या जमिनविरील प्रेम लक्षांत घेऊन त्यांच्या जमिनी वंशपरंपरा त्यांचेकडे ठेविल्या जातील, सरकारी नोकरी देतांना काळागोरा भेद न पाहतां प्रत्येकास त्याच्या पात्रतेप्रमाणें जागा दिल्या जातील.''

हा जाहिरनामा फक्त सत्तावनच्या बंडाचीं कारणें नाहीशीं करण्याचा प्रयत्न होता.

## नवी जागृति

जसें कंपनीनें आपलें तंत्र बदललें तसा हिंदी लोकांतही नवा दृष्टिकोन आला. ब्रिटिशांच्या पाश्चिमात्य शिक्षणाचा व जागतिक अनुभवाचा लोक भरपूर उपयोग करूं लागले, इंग्लंडचा इतिहास शिकून व जगांतील प्रगतिपथावरील राष्ट्रांच्या इतिहासानें हिंदी मत प्रगल्भ बनलें. सत्तावनच्या अयशस्वी क्रांतियुद्धानें जनतेंत एक प्रकारचें नैराश्य उत्पन्न झालें होतें व एकंदर जनमत ब्रिटिश सत्तेच्या सुराज्याला लालचावल्यासारखें दिसत असलें तरी एकदोन पिढ्यांच्याच शिक्षणानें रा. ब. नूलकर, श्री. सीतारामपंत चिपळूणकर, न्या. तेलंग, दादाभाई नौरोजी, फेरोजशा मेहता, श्री. चंदावरकर, रहिमतुल्ला सयानी, न्या. रानडे, डॉ. भांडारकर यांसारखे नवशिक्षित पुरुष निर्माण झाले. ब्रिटिशांकडे विनंत्या अर्ज करून आपणांस न्याय व सुधारणा मिळूं शकतील असा विश्वास या लोकांस असल्यानें त्यांनीं पुण्यास सार्वजनिक सभा, व मुंबईस बॉंबे असोसिएशन यांची स्थापना केली. महाराष्ट्राप्रमाणेंच बंगालमध्येंही डॉ. राजेंद्रलाल मिश्र, श्री. प्रसन्नकुमार टागोर व सुरेंद्रनाथ बानर्जी यांनीं इंडियन असोसिएशन काढली आणि मद्रासमध्यें हिंदु वर्तमानपत्र निघूं लागलें. या

★ ★ ★

★ ★ ★

सर्वांमार्फत ब्रिटिश राजवटीवर टीका करण्याचें काम सुरू झालें होतें. निरनिराळ्या शिक्षणसंस्था निघत होत्या व त्यांद्वारें जनतेंत शिक्षणाचा व तोही राष्ट्रीय शिक्षणाचा प्रसार सुरू करण्याचें कार्य नवशिक्षित लोकांनीं उचललें. सामाजिक सुधारणा करण्याचीही चळवळ सुरू झाली व ब्राह्मो व आर्य समाजांचें काम सुरू झालें.

## हिंदी कायदेमंडळाची स्थापना

दिवसेंदिवस ब्रिटिश राजवटीविरुद्ध तक्रारी वाढत जाणार हें ओळखून ब्रिटिश सरकारनें कौन्सिल्स ॲक्ट पास केला ( १८६१ ) या कायद्यानें व्हाइसरॉयच्या काउन्सिलमध्यें कायदे करण्यासाठीं नेमलेल्या जादा सभासदांचा आंकडा ६ वरून १२ वर नेला. हे सभासद १८५३ च्या कायद्याप्रमाणेंच संपूर्ण सभासद न होतां त्यांस फक्त कायदे पास करण्याच्या वेळींच बोलविण्याचें ठरलें. यावेळीं या १२ सभासदांपैकीं निम्मे सभासद बिनसरकारी इसमांतून सरकारनें नियुक्त करावयाचे होते. हिंदी लोकांस पहिल्या प्रथम आपल्या देशासाठीं तयार होणाऱ्या कायद्यांत सहभागी होण्याची संधि मिळाली. तसेंच १८३३ च्या कायद्यानें गव्हर्नरांचा कायदे करण्याचा अधिकार काढून घेण्यांत आला होता तोही त्यांस परत देण्यांत आला. नव्या कायद्यानें या कायदेमंडळांस दिलेल्या सवलती अत्यंत थोड्या होत्या. त्यांत जबाबदार राज्यपद्धतीचा अजिबात लवलेशहि नव्हता. गव्हर्नर जनरलची आगाऊ संमति असलेले कायदे पास करणें एवढेंच या कौन्सिलना काम होतें; या कौन्सिलनें पास केलेल्या कायद्यांस व्हाइसरॉयची संमति अवश्य होती. 'कायदे करण्यासाठीं नेमलेल्या समित्या–कायदेकानू करण्याच्या कामीं या

★ ★ ★

★ ★ ★

समित्यांचा सल्ला सरकार घेतें !' या कौन्सिलांचें असें मोठें मार्मिक वर्णन लॉर्ड मॅकडोनल्ड यांनीं केलें आहे. त्यांस कोणत्याही सार्वजनिक प्रश्नाची चर्चा करण्याचा अधिकार नव्हता, कोणत्याही प्रश्नाची सरकारला माहिती त्या विचारूं शकत नसत, तक्रारींची चौकशी करूं शकत नसत अगर सरकारी अधिकाऱ्यांचे वर्तनावर टीकाहि करूं शकत नसत. पण या कमिट्यांतूनच पुढें आजचीं विधिमंडळें विकास पावलीं.

१८८४ सालीं लॉर्ड रिपन यांच्या कारकीर्दींत लोकलबोर्ड व म्युनिसिपालिट्या स्थापन होऊन स्थानिक महत्त्वाचे प्रश्न त्यांमार्फत चालूं लागले. पुढें १८९२ च्या कायद्यानें लोकलबोर्डें, युनिव्हर्सिट्या, व्यापारी मंडळ्या यांचे प्रतिनिधि कायदेमंडळांत बसूं लागले. दिवसेंदिवस या कमिटींतील सभासदांच्या संख्येंत वाढ होत गेली; पण त्यांच्या अधिकारांतील वाढ मर्यादितच राहिली.

## हिंदी राष्ट्रीय कॉंग्रेसचा जन्म

ब्रिटिशांनी केलेल्या सुधारणा या हिंदी आकांक्षा व मागण्यांपेक्षां नेहमीं कमीच पडत होत्या. ब्रिटिश हिंदुस्थानांत एकछत्री अंमल सुरू झाल्यानें गेल्या ३।४ शतकांत नसलेली एकराष्ट्रीयत्वाची भावना लोकांत जागृत झाली. इथुन तिथून सारीच ब्रिटिश प्रजा. साऱ्यांची एकच गाऱ्हाणीं, व साऱ्या लोकांस आपलें हितगूज सांगण्यासाठीं ब्रिटिशांनी एका भाषेचें (इंग्लिशचें) ज्ञान दिलें. यांमुळें निरनिराळ्या प्रांतांत स्थापन झालेल्या लोकसभांचें व मंडळांचें एकसूत्री काम चालावें निदान सर्व ठिकाणच्या पुढाऱ्यांनीं वर्षांतून एकदां नाताळांत एकत्र जमावें असें ठरलें. पुण्याच्या सार्वजनिक सभेनें व मुंबई प्रांतिक असोसिएशननें यांत पुढा-

★ ★ ★

विभाग ... क्रमांक ... ९९२ नों. दि. ३९१३

★ ★ ★

कार घेतला. बंगालच्या इंडियन असोसिशनचे सुरेन्द्रनाथ बानेर्जी व मुंबईचे न्या. तेलंग यांनीं देशांतील सर्व पुढाऱ्यांना एकत्र बोलाविलें, ही परिषद १८८५ च्या नाताळांत पुण्यास भरणार होती. पण पुढें पुण्याच्या कॉलऱ्यामुळें ती मुंबईस भरली. तिचे अध्यक्ष श्री. सुरेन्द्रनाथ बानर्जी होते. या परिषदेचें हिंदी राष्ट्रीय संघांची परिषद असें नामाभिधान होतें. तिचें मुख्य उद्दिष्ट प्रांतांप्रांतांतील राष्ट्रीय प्रगतीच्या कार्यांची माहिती एकमेकांस व्हावी, व पुढील वर्षाचा एक सर्वसंमत कार्यक्रम आंखावा हें होतें.

## अर्ज आणि विनंत्या

या परिषदेच्या घटनेचें वगैरे सर्व काम ॲलेन ऑक्टोव्हो ह्यूम या स्कॉच सनदी नोकरानें केलें होतें. हिंदी लोकांनीं एकत्र येऊन आपलीं सुखदु:खें बोलावीं असें या गृहस्थांना कळकळीनें वाटत होतें यामुळें त्यांनीं या कार्यांत पुढाकार घेतला होता. या परिषदेचें 'हिंदी राष्ट्रीय सभा' (इंडियन नॅशनल कॉंग्रेस) हें नामाभिधान या परिषदेंत बहुमतानें ठरलें. या अगदीं पहिल्याच अधिवेशनांत ब्रिटिश राज्यकारभाराच्या चौकशीसाठीं शाही कमिशन नेमण्याची मागणी करण्यांत आली व त्याहीपलीकडे स्टेट सेक्रेटरीचें कौन्सिल रद्द करणें, मध्यवर्ति व प्रांतिक कायदेमंडळांची सुधारणा, लष्करी खर्चांत कपात, कापसाच्या आयातीवर कर बसविणें वगैरे प्रश्नांचीही चर्चा झाली. शिवाय कॉंग्रेसचे अधिवेशन दरवर्षीं भरविण्याचें ठरलें व तसें तें भरलेंहि. पण १८९९ च्या लखनौ कॉंग्रेसमध्यें 'सनदशीर मार्गांनी हिंदी राष्ट्राचें हितसंवर्धन करणें हें कॉंग्रेसचें ध्येय ठरेपर्यंत कॉंग्रेसपुढें एखादें विशिष्ट साध्य असें नव्हतें.

★ ★ ★

★ ★ ★

दरवर्षी नाताळांत देशांतील वकील, बॅरिस्टर, समाजसेवक व सरकारी सेवानिवृत्त नौकर जमत, एकमेकांची सुखदुःखें बोलत व कांहीं अन्याय वेशीवर टांगीत. पण विसाव्या शतकाच्या सुरुवातीस मात्र देशांत नवचैतन्य उत्पन्न झालें होतें. कॉंग्रेसच्या विनंत्यांना दाद मिळेनाशी झाली. कॉंग्रेसवर सरकारची वक्रदृष्टि चौथ्या अधिवेशनापासूनच वळली.

## 'राजद्रोही' कॉंग्रेसची स्वातंत्र्य–चतु:सूत्री

लॉर्ड डफरीनच्या सहकार्यानेंच पहिली कॉंग्रेस भरली तरी १८८९ सालीं त्या डफरीनसाहेबांनींच कॉंग्रेसला राजद्रोही म्हटलें. सरकारी अधिकाऱ्यांस तिच्या अधिवेशनांत भाग घेण्याची मनाई केली.

दादाभाई नौरोजी, ना. गोखले वगैरे मुत्सद्दी विलायतेंत गेले. त्यांनीं हिंदुस्थानवरील अन्याय विलायतेंत वेशीवर टांगला, दादाभाई तर पार्लमेंटचे सभासदही झाले व त्यांनीं हिंदी प्रश्नास पार्लमेंटमध्येंहि तोंड फोडलें पण तें सर्व निष्फळच ठरलें. हिंदुस्थानांतील कार्यकर्त्यांत दहशतवादाची पकड वाढली, रॅंडसारख्या लोकांचे खून झाले.

देशांतील असंतोषास बंगालच्या नियोजित फाळणीनें तोंड फोडलें. बंगालच्या लढ्याच्या हाकेमागें सारा देश उभा राहिला.

कलकत्त्याच्या दादाभाई नौरोजी यांच्या अध्यक्षतेखालीं भरलेल्या अधिवेशनांत दादाभाईंनीं स्वराज्याची सुप्रसिद्ध घोषणा करून स्वराज्य, स्वदेशी, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण या चतु:सूत्रीचा अवलंब करण्याचें घोषित केलें. वंदेमातरम् हें राष्ट्रगीत याच वेळीं आलें.

गव्हर्नरच्या कायदेमंडळांत सहकार्य न करून राजकीय बहिष्कारही घातला गेला पाहिजे असें ठरलें.

★ ★ ★

★ ★ ★

## दडपशाही व सुधारणा

देशांत दहशतवाद, राजकीय गुन्हे व खून होऊं लागले आणि लॉर्ड मिंटो या व्हाइसरॉयनें दडपशाही आरंभिली पण दडपशाहीनें कॉंग्रेस दडपली गेली नाहीं तर तिचा जोर वाढलाच. देशांतील दडपशाहीनें जहाल पुढाऱ्यांना तुरुंगवास भोगावा लागला. सभाबंदीचे व मुद्रण-स्वातंत्र्याच्या गळचेपीचे हुकूम जारी झाले. लो. टिळकांस ६ वर्षांची कठोर शिक्षा झाली. यामुळें १९०७ पासून १६ सालापर्यंत कॉंग्रेस मवाळांच्या हातांत गेली.

१९०८ सालीं ब्रिटिश साम्राज्यांतर्गत वसाहतींच्या धर्तीवरील स्वायत्तता मिळविण्याचे सनदशीर प्रयत्न करणें हें कॉंग्रेसचें ध्येय ठरलें. यामुळें 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे व तो मी मिळविणारच' ही घोषणा करणारे टिळक यांचें कॉंग्रेसशीं पटेना.

मवाळांच्या अर्ज-विनंत्या सुरूच होत्या. ब्रिटिश साम्राज्यशाहीनें त्यांच्या विनंत्यांस मान देऊन १९०९ च्या सुधारणा जाहीर केल्या !

या कायद्यानें कायदेमंडळांची वाढ होऊन त्यांत बिनसरकारी सभासदांचें बहुमत झालें; व कांहीं सभासद लोकांतर्फे निवडून द्यावे असेंही ठरलें.

## बेजबाबदार विधिमंडळें

कायदेमंडळांतील सभासदांस कांहीं जादा अधिकारही मिळाले. त्यांस उपप्रश्न विचारण्याची सवलत मिळून सरकारी कारभारावर टीका

★ ★ ★

★ ★ ★

करतां येऊं लागली. शिवाय सरकारच्या कारभारावर टीका करणारे ठरावहि मांडता येऊं लागले. पण अजून कायदे मंडळांचें जुनें रूप पालटलें नव्हतें. लोकप्रातिनिधिक सरकारचें मुख्य लक्षण जी जबाबदारी ती या विधिमंडळांत बिलकूल नव्हती. मॉंटेग्यू चेम्सफर्ड अहवालांत म्हटल्याप्रमाणें या कायद्यानें जुन्या धोरणांत बदल झालेला नाहीं. ब्रिटिश सरकारच अजून अनियंत्रित सत्ता चालवीत होतें, व फक्त कायदे-मंडळांमार्फत लोकमत पहात होतें. उपकारशील असली तरी ब्रिटिश राजकर्त्यांची मुखत्यारीच सुरु होती. ※

या कायद्यानें प्रागतिकांचें थोडेंसें समाधान झालें. पण ज्यावेळीं हिंदी लोकांची आकांक्षा साम्राज्यांतर्गत वसाहतींच्या स्वराज्याची होती त्यावेळीं फक्त कायदे-कौन्सिलांत त्यांस थोडेफार अधिकार देण्यास ब्रिटिश सरकार तयार झालें. राष्ट्रवादी हिंदी लोकांचें यामुळें समाधान होणें शक्य नव्हतें. बंगाल फाळणीच्या चळवळीपुढें ब्रिटिश साम्राज्य-वाद्यांस नमावें लागलें व ती फाळणी पुढें राज्यारोहण समारंभाचे वेळीं रद्द झाली.

---

※ "The Morley Minto Reforms in our view are the final outcome of the old conception which made the Govt. of India a benevolent despotism (tempered by a remote and only occasionally vigilant democracy) which might as it saw fit for the purposes of enlightenment consult the wishes of its subjects"

M. C. Report

✶ ✶ ✶

## आपलें राष्ट्रीय सरकार

★ ★ ★

प्रतिवर्षी कॉंग्रेसचें कार्य वाढतच जात होतें. देशांत कॉंग्रेसच्या नेतृत्वा-खालीं जनतेची शक्ति संघटित होत होती.

इंग्रजी व युरोपियन राज्यघटनांचा अभ्यास केलेल्या व लोकशाहीची यथायोग्य कल्पना आलेल्या हिंदी जनतेचें समाधान झालें नाहीं.

हिंदी कायदे कौन्सिलांना अधिकार अगदींच तुटपुंजे असल्याचें लवकरच हिंदी प्रतिनिधींच्या निदर्शनास आलें. लोकप्रतिनिधि कायदे कौन्सिलांत ठराव आणीत, सरकारावर टीका करीत. सरकार स्वस्थ बसे व आपणास नको असलेले कायदे अमान्य करी.

### व्हाइसरॉयच्या कार्यकारिणीवरील पहिला हिंदी सभासद

१९०९ च्या सुधारणा कायद्यानें व्हाइसरॉयच्या कार्यकारिणींत एक महत्त्वाचा फरक घडून आला व तो म्हणजे अगदीं प्रथमच एका हिंदी सभासदाची नेमणूक कार्यकारिणीवर झाली. यावेळीं इंग्लंडमध्यें या नेमणुकीनें बरीच खळबळ उडाली.

लॉर्ड रिपनसारख्या हिंदुस्थानच्या मित्राचाही या गोष्टीस विरोध होता. केवळ मोर्लेसाहेबांच्या हट्टानेंच ही गोष्ट शक्य झाली व पहिल्यानें सर एस. पी (मागाहून लॉर्ड) सिंह यांची लॉ मेंबर म्हणून नेमणूक झाली. त्याच वेळीं भारतमंत्र्याच्या कौन्सिलांतही दोन हिंदी सभासदांची प्रथम नेमणूक झाली. या गोष्टीस आतां फक्त ऐतिहासिकच महत्त्व शिल्लक असलें तरी त्यावेळीं त्यांस ब्रिटनमध्यें सर्वत्र विरोधच झाला होता व हिंदुस्थानांतील मवाळांकडून त्यांचें स्वागतच झालें होतें.

पण या सर्व सुधारणांचा फुसकेपणा कळतांच कॉंग्रेस नेतृत्वाखालीं

★ ★ ★

★ ★ ★

देशांत लढ्याची तयारी झाली व चळवळ सुरूही झाली. पण इतक्यांत युरोपांत पहिलें महायुद्ध सुरू झालें व तिकडे लोकांचें लक्ष वेधलें. त्यामुळें चळवळ थंडावली. कौन्सिलांतील लोकप्रतिनिधीही सुधारणांवर नाराजच होते. त्यांनीं नव्या सुधारणांचा एक मसुदा तयार केला व व्हाइस-रॉयांकडे पाठविला.

## होमरूल-चळवळ

याच सुमारास मुस्लिम लीगनेंही कॉंग्रेसप्रमाणेंच साम्राज्यांतर्गत वसाहतीच्या स्वातंत्र्याची मागणी केली.

दरम्यान नेमस्त पुढारी ना. गोखले व सर फेरोजशहा मेहता हे निवर्तले व नेमस्तपक्ष फिक्का पडला. याच वेळीं लो. टिळक शिक्षा भोगून मंडालेहून परतले. त्यांच्या पुनरागमनानें कॉंग्रेसमध्यें जहालांचें प्राबल्य वाढलें. याच सुमारास सुप्रसिद्ध थियॉसॉफिस्ट ॲनी बीझन्टबाई यांनीं होमरूल लीग नांवाची संस्था काढली व कॉंग्रेसच्या अधिवेशनांत ठरणारें धोरण वर्षभर पुढें चालविण्याची दक्षता घेतली. लोकमान्यांनीही स्वराज्यसंघ स्थापिला. व सर्व देशभर पुढाऱ्यांनीं लोकजागृतीसाठीं दौरे काढले.

‘ हिंदुस्थानास स्वराज्याच्या दृष्टीनें पुढील सुधारणा लवकर देण्यांत येऊन त्यांत प्रांतिक स्वायत्तता द्यावी, कायदेकौन्सिलांची सुधारणा व वाढ करून सर्व प्रांतांत कायदेकौन्सिलें स्थापावीं, कार्यकारी कौन्सिलांची पुनर्घटना करावी, इंडिया कौन्सिल रद्द तरी करावें अगर त्याची सुधारणा तरी करावी व स्थानिक स्वराज्याबाबत अधिक उदार धोरण स्वीकार-ण्यांत यावें ’ अशा आशयाच्या मागण्या करणारा ठराव १९१५

★ ★ ★

★ ★ ★

सालच्या मुंबई कॉंग्रेसनें केला. त्याच ठरावानें मुस्लिमलीग व कॉंग्रेस यांनीं स्वराज्याची संयुक्त योजना करावी असें सुचविलें होतें. या वर्षा-पासून होमरूल लीगची चळवळ जोरांत सुरू झाली. व तिनें कॉंग्रेस-धोरणाचा प्रसार करण्याचा सपाटा चालविला. होमरूल (घरचें राज्य)ची मागणी हेंच कॉंग्रेस लढ्याचें घोषवाक्य होतें.

लखनौच्या कॉंग्रेसमध्यें हिंदु-मुसलमानांचें ऐक्य घडून आलें.

देशांत स्वातंत्र्याची चळवळ सुरू असली तरी इंग्रजांनीं युद्धांत न्याय्य बाजू घेतली असल्यानें हिंदुस्थाननें ब्रिटनला बरीच स्वयंस्फूर्त मदत केली.

## आंतरराष्ट्रीय गटबाजीसाठीं हिंदुस्थानची फसवणूक

अमेरिकेनें युद्धपदार्पण करतांना १४ कलमी घोषणा केली. त्यांत प्रत्येक लहान मोठ्या राष्ट्राला स्वतःच्या देशाची राज्यपद्धति ठरविण्याचा हक्क असल्याचें घोषित केलें होतें. हिंदुस्थाननें केलेली मदत व हिंदु-स्थानांत होत असलेली जागृति लक्षांत घेऊन बऱ्याच धूर्त इंग्लिशांस हिंदी लोकांना वेळींच कांहीं तरी द्यावें असें वाटत होतें.

युद्धकाळांत साम्राज्यांतील युद्धमंत्र्यांचें संयुक्त मंडळ स्थापण्यांत आलें होतें. त्याच्या १९१७ सालीं भरलेल्या पहिल्या बैठकीस हिंदु-स्थानतर्फे भारतमंत्रीच उपस्थित राहिले. पुढें त्यांचे मदतीस बिकानेरचे महाराज, सर जेम्स मेस्टन व सर एस. पी. सिंह यांची असेसर्स म्हणून नेमणूक झाली. साम्राज्यपरिषदेंत भारतमंत्र्यांबरोबर लॉर्ड सिंह व पति-याळाचे महाराज यांनीं भाग घेतला. युद्धमंडळ व साम्राज्यपरिषद यांवरील

★ ★ ★

★ ★ ★

हिंदी प्रतिनिधि लोकनियुक्त असावेत अशी कॉंग्रेसनें मागणी केली. पुढें पॅरिसला तहपरिषद झाली त्या तहपरिषदेंत आपले हुकमी मतांत भर पडावी म्हणून ब्रिटननें हिंदुस्थानला स्थान मिळवून दिलें, पुढें नव्यानें स्थापन झालेल्या राष्ट्रसंघाच्या घटनेनें असें ठरलें कीं शांतता परिषदेंत तहावर सह्या करणारीं राष्ट्रें राष्ट्रसंघाचीं सभासदराष्ट्रें व्हावीं. त्यामुळें आपोआपच हिंदुस्थानहि राष्ट्रसंघांत गेला. युद्धकाळांत हिंदी प्रतिनिधि इतर वसाहतींच्या बरोबर युद्ध मंत्रिमंडळांत बसले, साम्राज्य परिषदेंत गेले, शांतता परिषदेंत गेले व राष्ट्रसंघांतहि गेले. कांहीं कायदेपंडितांनीं हिंदुस्थानचा वसाहतीचा दर्जा मान्य झाल्याचाच अर्थ यांतून लावला तर कांहींना यांत ब्रिटिशांनीं आपलें अंतिम ध्येय वसाहतींचें स्वराज्य तत्वतः मान्य केल्याचें दिसलें. वस्तुस्थिति मात्र निराळी होती. ब्रिटनला आपलीं हुकमी मतें आंतरराष्ट्रीय परिषदांत वाढवावयाचीं होतीं. हिंदी लोक एवढ्यानें फसते तर त्यांस पाहिजेच होतें. वसाहतींच्या स्वराज्याची त्यावेळची कल्पना निदान प्रातिनिधिक व जबाबदार अंतर्गत राज्यघटनेची होती पण येथें तर व्हाइसरॉयची अनियंत्रित सत्ता होती.

## साम्राज्यांतर्गत जबाबदारीच्या स्वराज्यास मान्यता

'ब्रिटिश साम्राज्याचा एक अंशभूत भाग म्हणून हिंदुस्थानांत प्रगतीपर मार्गानें जबाबदारीच्या स्वराज्याची घटना घडवून आणणें; स्वयंशासित संस्थांच्या स्वरूपाची क्रमशः वाढ करणें व त्यासाठीं राज्यकारभारांतील प्रत्येक खात्यांत हिंदी लोकांचाच जास्त जास्त संबंध येऊं देणें हें आमचें ध्येय आहे' अशी घोषणा भारतमंत्रि मि. मॉंटेग्यू यांनीं २७

★ ★ ★

★ ★ ★

पार्लमेंटांत केली (ऑगस्ट १९१७) ही घोषणाच काय ती भावी हिंदी परिस्थितींतील फरकाची निदर्शक होती.

या घोषणेनें हिंदुस्थानचें अंतिम ध्येय साम्राज्यांतर्गत जबाबदारीच्या स्वराज्याचें आहे हें घोषित झालें.

या घोषणेचें हिंदुस्थानांत बरेंच स्वागत झालें. घोषणेच्या पूर्ततेसाठीं १९१७ च्या नोव्हेंबरांत भारतमंत्रि हिंदुस्थानांत आले. त्यांनीं व्हाइसरॉय चेम्सफर्ड यांजबरोबर सर्व परिस्थितीचा विचारविनिमय करून प्रांतिक सरकारें व लोकपुढारी यांचीं मतें समजाऊन घेऊन सर्व परिस्थितीचा आढावा घेतला, तो मॉंटेग्यु चेम्सफर्ड रिपोर्ट म्हणून प्रसिद्ध आहे. त्यांत स्थानिक संस्थांना स्वातंत्र्य, हळुहळु प्रांतांना पूर्ण अधिकारदान, कायदे-कौन्सिलांत वाढ व वाढत्या प्रमाणांत हिंदी लोकांना राज्यकारभारांत ध्यावें अशा शिफारशी करण्यांत आल्या. * पुढें याच शिफारशींवर आधार-लेल्या १९१९ च्या सुधारणा आल्या त्या मॉंटेग्यु चेम्सफर्ड सुधारणा या नांवानें ओळखल्या जातात. हिंदुस्थानचें ध्येय निश्चित झाल्यानें व मागील काळापेक्षां फार मोठा सुधारणांचा हप्ता जाहीर झाल्यानें या कायद्यापासून हिंदुस्थानच्या घटनेनें एक नवा टप्पा गांठला.

---

* "The Policy of His Majesty's Government, with which the Govt. of India are in complete accord, is that of the increasing association of Indians in every branch of the administration and the gradual development of self governing institutions, with a view to a progressive realisation of responsible govt. in India as an integral part of the British Empire."

★ ★ ★

★ ★ ★

## एक महत्त्वाची पायरी

२० ऑगस्ट १९१७ च्या घोषणेनें एक शक काल संपून दुसऱ्याची सुरवात झाली. आजपर्यंत हिंदुस्थानवर आपण अनियंत्रित सत्ता गाजविली; पण त्याचबरोबर हिंदी लोकांस राज्यकारभारांत दिवसेंदिवस जास्त जास्त स्थान देऊन, व सरकारवर टीका करून त्याचे धोरणांत बदल करून आणण्याची संधीहि वाढत्या प्रमाणांत दिली. लोकप्रिय सरकारांची खूण म्हणजे जबाबदारी, व नेमका तिचाच या कौन्सिलांत अभाव आहे. जबाबदारी कौन्सिलांत आणून ठेवणें हें आमचें पहिलें उद्दिष्ट आहे. त्यांस खरोखर कांहीं तरी काम करण्यास दिलें पाहिजे, व आपण काम करीत असल्याचें दाखविण्यास त्यांस खऱ्या जनतेचीही गरज असते.*

---

"The announcement of August 20, 1917, marks an end of one epoch, and the beginning of the new one. Hitherto, we have ruled India by a system of absolute government, but have given her people an increasing share in the administration of the country and increasing opportunities of influencing and criticising the government. Responsibility is the savour of popular government and that savour the present councils wholly lack. Our first object must be to invest them with it. They must have real work to do; and they must have real people to call them to account for their doing it." M. C. Report.

★ ★ ★

# ४ : : वेस्टमिनिस्टर कायद्याच्या स्वराज्याकडे

★ ★ ★

" पार्लमेंटनें आज बरेच दिवस ज्या लोकांस राज्यकारभाराचें शिक्षण दिलें त्या लोकांस आपली सत्ता थोडीशी तरी देण्याची वेळ आली आहे; जी काय सत्ता द्यावयाची असेल ती ब्रिटिश लोक कुरकुर न करतां उदारपणें व आपल्या थोरपणास साजेशीच देतील.* "

मॉंटेग्यू चेम्सफर्ड अहवालाप्रमाणें १९१९ च्या सुधारणा कायद्यानें सुधारणांचा पहिला महत्त्वाचा हप्ता जाहीर झाला.

"By general admission, the time has come for Parliament to share its power with those who for genarations it has sought to train in the art of government; and, whatever may be the

★ ★ ★

★ ★ ★

या सुधारणांचें साधारण स्वरूप पुढीलप्रमाणें होतें.

या कायद्यानें हिंदुस्थानांत ९ गव्हर्नरचे व ६ कमिशनरचे प्रांत पाडण्यांत आले. गव्हर्नरांच्या प्रांतांचा कारभार गव्हर्नर व त्याचें कार्यकारी कौन्सिल यांचेकडे सोंपविण्यांत आला व तेथें लोप्रतिनिधींचें ७० टक्के बहुमत असलेलीं व सभापति निवडण्याचा अधिकार असलेलीं कायदे मंडळें स्थापण्यांत आलीं. प्रांताच्या शांततेसाठीं व सुराज्यासाठीं कांहीं अपवाद सोडल्यास त्यांस सर्व प्रकारचे कायदे पास करण्याचा अधिकार मिळाला. प्रांतांतील खात्यांत राखीव व सोंपीव असे दोन प्रकार करून राखीव खातीं गव्हर्नरच्या अखत्यारींत चालत व त्यासाठीं तो कार्यकारिणीवरील सभासदांचा सल्ला घेई. पण सोंपीव खात्यांच्या कारभारांत जबाबदारीचें तत्त्व मान्य करण्यांत येऊन त्यांच्या कारभारासाठीं लोकनियुक्त सभासदांपैकीं गव्हर्नरनें नेमलेल्या दिवाणांमार्फत चालवावा; सोंपीव खात्यांच्या कारभाराबद्दल दिवाण मुख्यत: कायदेमंडळांना जबाबदार रहावे असें ठरलें. प्रांतिक कारभारांत मिळालेल्या या सवलतीस द्विदल राज्यपद्धति म्हणतात.

कमिशनरचे ६ प्रांतांत या सुधारणांनीं फरक झाला नाहीं.

सर्व हिंदुस्थानचे कारभारास गव्हर्नर जनरल व त्याचें कार्यकारी मंडळच जबाबदार मानलें गेलें. गव्हर्नर जनरलला अनियंत्रित सत्ता

---

measure of the power thus to be transfered, we are confident that Parliament in consonance with its dignity and with the tradititions of the British people will make the transfer generously no grudging spirit." J. S. C. Report.

✶ ✶ ✶

★ ★ ★

आहे. त्याच्या कार्यकारिणीच्या बहुमतास मान देण्यास तो बांधलेला नाहीं.

नवीन सुधारणांनीं मध्यवर्ति विधिमंडळांत महत्वाचे फरक झाले. कनिष्ठ विधिमंडळ ( सेंट्रल लेजिस्लेटिव्ह असेंब्ली ) व वरिष्ठ विधिमंडळ ( कौन्सिल ऑफ स्टेट ) अशीं दोन विधिमंडळें झालीं. कनिष्ठ विधिमंडळांतील सभासदांची संख्या ६८ वरून १४४ वर गेली. त्यांतील पांच-सप्तमांश सभासद लोकप्रतिनिधि रहातील असें ठरलें. या सभेचा अध्यक्ष सभासदांनी निवडलेला असावा असेंही ठरलें. त्याप्रमाणें पहिले अध्यक्ष ना. विठ्ठलभाई पटेल झाले.

कौन्सिल ऑफ स्टेटची स्थापना होऊन त्यांत ६० सभासद असावेत असें ठरलें. श्रीमान् लोक, बडे जमीनदार, वगैरेंनीं निवडलेले यांतील ३४ सभासद असावेत.

## कार्यकारिणीचें वाढतें हिंदीकरण

कोणताही कायदा होण्यास या दोन्ही मंडळांची संमति लागूं लागली. वार्षिक सरकारी अंदाजपत्रकांतील राखीव भाग सोडून इतर भागास विधिमंडळांची संमति लागते. देशांत कोणताही नवा कर बसवायचा झाला तरी त्यास या विधिमंडळाची संमति लागते. इतकें असलें तरी गव्हर्नर जनरलचे खास अधिकार, त्यांचेवर देशांतील शांतता व सुव्यवस्थिता टिकविण्याची टाकलेली खास जबाबदारी, नापास झालेल्या बिलाला सर्टिफिकेट देऊन संजीवनी देण्याचा, पास झालेल्या बिलास नकारघंटा लावण्याचा त्यांचा अधिकार ( सर्टिफिकेशन अॅन्ड व्हेटो ) यांमुळें दिलेली सत्ता अगदींच तकलुपी ठरली. या कायद्यानें व्हाइसरॉय यांच्या

★ ★ ★

★ ★ ★

कार्यकारिणींतील निदान ३ तरी सभासद हिंदी असावे असें ठरलें व गव्हनरांच्या कार्यकारिणींतील निम्मे सभासद हिंदी रहावे असें ठरलें. पण हिंदी लोकांची राजकीय आकांक्षा एवढ्यानें तृप्त होणारी नव्हती. कार्यकारिणीवर नुसत्या गोऱ्यांऐवजीं काळ्या सभासदांचा भरणा केला म्हणजे स्वराज्य नव्हे. हिंदी लोकांस जबाबदारीच्या राज्यघटनेची आवश्यकता होती व या नव्या सुधारणांनीं नेमकी ती जबाबदार राज्य-व्यवस्थाच देण्याचें टाळलें होतें. हिंदी लोकांनीं आपलें अंतिम ध्येय होमरूल आहे हें जाहीर केलें होतें. हिंदी घटना कशी असावी त्याचा आदर्श या होमरूलमध्यें अगर बीझंटबाईच्या कॉमनवेल्थ योजनेंत होता. पण त्या मागणीचा व या सुधारणा ह्त्याचा मेळ बसणें शक्यच नव्हतें; या सुधारणांत वसाहतींच्या स्वराज्याचा निर्देशहि नव्हता. फक्त हिंदु-स्थानला क्रमशः जबाबदारीचें स्वराज्य देण्यांत येईल एवढीच घोषणा होती. यामुळें कॉंग्रेसला या सुधारणा मान्य नव्हत्या.

## जालियनवाला बाग

१९१८ सालीं युद्ध संपलें, हिंदुस्थानला सुधारणा देण्याची घोषणा झाली; पण हिंदुस्थानांत जुलुमी वटहुकुमांचें राज्यच सुरू राहिलें.

युद्धकाळांत जर्मन लोकांबरोबर ब्रिटिशविरोधी कारस्थानें करण्यासाठीं या देशांतील कांहीं लोकांनीं संधान बांधल्याची बातमी साम्राज्य सरकारला लागली. याची चौकशी करण्यासाठीं न्या. रौलट यांच्या नेतृत्वाखालीं सरकारनें चौकशी कमिशन नेमलें. या कमिटीच्या शिफारसीनें क्रांति-कारक चळवळी दडपण्यासाठीं सरकारला विशेष अधिकार देणारा कायदा लोकमताविरुद्ध करण्यांत आला (१९१९). याला रौलट ॲक्ट म्हणतात.

★ ★ ★

★ ★ ★

या जुलुमी कायद्याच्या विरुद्ध देशांत लढा सुरू झाला. या वेळीं लढ्याचें नेतृत्व म. गांधींकडे होतें. महात्माजींनीं आपल्या अहिंसात्मक सत्याग्रहाचे यशस्वी प्रयोग आफ्रिकेंत केले होते; त्यांनीं हिंदुस्थानांतहि अहिंसात्मक सत्याग्रही लढ्याला सुरुवात केली. त्यांनीं जनतेला कायदेभंगाचा आदेश दिला. ठिकठिकाणीं राजकीय सभा भरविण्यांत आल्या.

पंजाबमधील ले. गव्हर्नर ओडवायरनें लोकांची नागरी हक्कांची चळवळ दडपण्यासाठीं पाशवी उपाययोजना केली. काँग्रेस मोडावी म्हणून त्यानें लष्करी कायदा पुकारला, अमृतसरला जालियनवाला बागेंतील सभेवर लष्करी घोडदळ सोडलें व असंख्य निःशस्त्र लोकांची क्रूर कत्तल केली. या अन्याय्य पाशवी वृत्तीमुळें सारी हिंदी जनता खडबडून जागी झाली. तिच्यांत क्रोध व क्षोभ उत्पन्न झाला व सारें राष्ट्र चवताळून उठलें. त्या सालीं अमृतसरलाच काँग्रेस भरली व ती गाजलीही भरपूर. १९१८ सालच्याच काँग्रेसमध्यें राजनिष्ठेच्या ठरावांना मूठमाती मिळाली होती.

## वीस सालची असहकाराची चळवळ

१९२० च्या नागपूर काँग्रेसमध्यें एक मोठी क्रांति झाली होती. पूर्वीच्या ब्रिटिश साम्राज्यांतर्गत वसाहतीच्या धर्तीवर सनदशीर मार्गांनीं स्वायत्तता मिळविणें ' या काँग्रेसच्या ध्येयांतून वसाहतीच्या धर्तीवर या शब्दांस फाटा मिळाला व आतां ब्रिटिशसाम्राज्यांतर्गत सदनशीर न्याय्य व शांततेच्या मार्गांनीं स्वायत्तता मिळविणें हें काँग्रेसचें ध्येय बनलें. याच सालच्या कलकत्त्याच्या खास अधिवेशनांत सरकारी पदव्या, शाळा, कॉलेजें, कोर्ट, कायदेमंडळें, व सरकारी नोकऱ्या यांवर बहिष्कार घालून सरकारशीं असहकारिता पुकारण्याचा ठराव मंजूर झाला.

★ ★ ★

★ ★ ★

तुर्कस्तानबरोबर दोस्तांनीं तह केला त्या वेळीं या मुसलीराष्ट्राचे अधिकार फारच मर्यादित केल्यानें हिंदीच नव्हे तर पश्चिम आशियांतील अखिल मुस्लिम जनतेचें असमाधान झालें. गांधीजींनीं अलीबंधूंच्या सहाय्यानें मुस्लिम असंतोषासहि वाचा फोडली व देशाच्या लढ्यांत हिंदु-मुसलमान सहभागी झाले.

१९२० सालीं देशांतील राजकीय असंतोष व वाढती महागाई यांमुळें पहिल्यानेंच देशव्यापी संप झाले.

## प्रतियोगी सहकार्य

व्हाइसरॉय लॉर्ड रीडिंग यांनीं सर शंकरन् नायर यांचे मध्यस्थीनें तडजोडीचा प्रयत्न केला. सर शंकरन् यांचे अध्यक्षतेखालीं सर्वपक्षीय परिषद भरली, पण तडजोड झाली नाहीं.

पुढें गयेच्या कॉंग्रेसमध्यें कौन्सिल प्रवेशाला मान्यता देण्यांत आली, व देशपुढारी कौन्सिलांत शिरून स्वराज्याची चळवळ करूं लागले.

ना. विठ्ठलभाई पटेल यांनीं सभागृहांतील आपली अध्यक्षीय कारकीर्द अत्यंत नेकीनें चालवून गाजविली. असेंब्लींत गेलेल्या कॉंग्रेसपक्षानें हिंदुस्थानला स्वराज्य द्यावें असे ठराव पास केले. मुडीमन कमिटीच्या बहुमतानें झालेल्या शिफारसी फेटाळल्या व हिंदुस्थानला वसाहतीचें स्वराज्य ताबडतोब द्यावें ही पं. मोतीलाल नेहरू यांची उपसूचना ७२ अनुकूल व ४५ प्रतिकूल मतें पडून पास झाली.

असेंब्लीबाहेर करबंदीची चळवळ बार्डोलीला सुरू झाली. पण चौरीचुरा येथें व इतरत्र अत्याचारी प्रवृत्ति वाढल्यानें गांधीजींनीं लढा

★ ★ ★

★ ★ ★

मागें घेतला. महात्माजींनीं खादीप्रसाराची मोहीमही याच काळांत काढली.

## नेहरू अहवाल

हिंदुस्थानांतील लढ्यानें इंग्लंडांतही मंत्रिमंडळाला बेचैन करून सोडलें होतें. भारतमंत्री लॉर्ड बर्कनहेड यांनीं तुम्हांस काय पाहिजे हें आम्हांस नक्की सांगा असें हिंदी जनतेस आव्हान दिलें. हिंदी जनतेनें त्याचा स्वीकार केला व सर्वपक्षीय सभेंत नेहरू कमिटी नेमण्यांत आली ( १९ मे १९२८ ). या नेहरू कमिटीनें आपला अहवाल सादर केला व त्यांत ' तूर्त पण तावडतोब वसाहतींच्या स्वराज्याची मागणी ' केली. पं. मोतीलाल नेहरू यांचा हा अहवाल सर्वपक्षीय सभेंत मंजुर होऊं शकला नाहीं. जीनांनीं आपले सुप्रसिद्ध १४ मुद्दे पुढें आणले.

जबाबदारीच्या स्वराज्याचें तत्त्व हिंदुस्थानांत कितपत वाढवितां येईल अगर असलेलें जबाबदारीचें राज्य कितपत नियंत्रित करतां येईल याचा अहवाल सादर करण्याकरितां सायमन कमिशनची नेमणूक करण्यांत आली. या सायमन कमिशननें हिंदुस्थानची पहाणी करण्यासाठीं दोनदां हिंदुस्थानची वारी केली ( १९२७ ). पण जनतेनें कमिशनवर बहिष्कार घातला असल्यानें लोकपुढारी कमिशनला भेटले नाहींत. कमिशनचें सर्वत्र काळ्या निशाणांनींच स्वागत झालें.

## संपूर्ण स्वराज्याची मागणी

वसाहतीच्या स्वराज्याचा पं. मोतीलाल नेहरू यांचा अहवाल १९२८ च्या कलकत्ता कॉंग्रेसनें मान्य केला असला तरी त्या ठरावाप्रमाणें ब्रिटिश सरकारनें कांहीं न केल्यानें पुढच्याच लाहोर कॉंग्रेसनें

★ ★ ★

★ ★ ★

(१९२९) पं. जवाहरलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखालीं संपूर्ण स्वराज्याची घोषणा केली. म. गांधींनींही व्हाइसरॉयशीं तडजोडीचीं बोलणीं लावण्याचें घोषित केलें व तडजोड फिसकटल्यास संपूर्ण स्वातंत्र्याच्या घोषणेस पूर्ण पाठिंबा देऊन स्वातंत्र्य लढ्याचें नेतृत्व स्वीकारीन असें बजावलें. याच्या अगोदर दोनच महिने हिंदुस्थानचे व्हाइसरॉय लॉर्ड आर्यावन हे विलायतची वारी करून आले होते व त्यांनीं १९१७ च्या घोषणेंतच हिंदुस्थानचें अंतिम ध्येय वसाहतीचें स्वराज्य असल्याचा खुलासा केला (३१ ऑ. १९२९). *

ही गोष्ट ब्रिटिश सरकारला १९१९ च्या सुधारणा कायद्यांच्या हेतुवाक्यांत अभिप्रेत वाटली ती स्पष्ट करण्यास सरकारला १० वर्षें लागलीं.

१९१९ सालींच हें स्पष्टीकरण होतें तर हिंदी जनतेचें त्यावेळीं समाधान झालें असतें. पण आयर्विनच्या म्हणण्यांत असत्य भरलें आहे. १९२७ सालीं सायमन कमिशनची नेमणूक झाली त्यावेळी कमिशनला कामाबद्दल दिलेल्या आदेश पत्रकांत डोमिनियन स्टेटसचा उल्लेख नव्हता. १९२८ चा

---

"I am authorised on behalf of His Majesty's Government to state clearly that in their judgment it is implicit in the declaration of 1917 that the natural issue of India's constitutional progress as therein contemplated is the attainment of Dominion Status."

—Lord Irwin.

★ ★ ★

★ ★ ★

नेहरू रिपोर्ट सरकारनें अमान्य करून त्या वर्षींही वसाहतींच्या स्वरा ज्यास आपली मान्यता नसल्याचें दाखविलें. १९२९ सालीं आयर्वि साहेबांमार्फत हा खुलासा करण्याचें मुख्य कारण म्हणजे देशांती वाढलेली जागृति व अस्वस्थता यांमुळें चळवळ होण्याची भीति निर्मा झाली होती. चळवळ होऊं नये हाच या मागील स्वार्थी हेतू होता. प १९२९ सालीं देशाची भूक वाढली होती. आम्हांस संपूर्ण स्वातंत्र्य पाहिजे होतें.

## लढ्यापूर्वीच्या वाटाघाटी

व्हाइसरॉयनीं आपल्या वक्तव्यांत देशांतील पुढाऱ्यांस भेटण्याची व शक्यतर सर्वपक्षीय परिषद भरवून पार्लमेंटला भावी घटनेबाबत सूचना करण्याची योजनाहि मांडली.

लाहोरची कॉंग्रेस भरण्यापूर्वी महात्माजी, पं. मोतीलाल नेहरू, श्री. विठ्ठलभाई पटेल, सर तेजबहादुर सप्रू व श्री. जीना हे २३ डिसेंबर १९२९ ला व्हाइसरॉयना भेटले. भेटींत नियोजित लंडनपरिषदेच्या कार्यांची चर्चा झाली. या परिषदेंत कोणासहि वाटेल तें मत देण्याची मुभा राहील व एकमतानें पास झालेले ठराव ब्रिटिशसरकारला विचारांत घ्यावे लागतील. वसाहतींचें स्वराज्य देण्याची योजना आंखण्यास व वसाहतींच्या स्वराज्यास मान्यता देण्यास आगाऊ कबूल झाल्याशिवाय ब्रिटिश सरकार कॉंग्रेसला त्या परिषदेंत भाग घेण्यास अनुमति देण्यास बऱ्याच अडचणी होत्या. 'जास्तींत जास्त बहुमतानें पास झालेली योजना पार्लमेंटला सादर करण्यासाठीं सरकानें परिषद बोलावली असल्यानें सरकार कॉंग्रेसला तसें आश्वासन देऊं शकत नाहीं.' असें पत्रक सरकारनें दिल्लीच्या वाटाघाटींबाबत काढलें.

★ ★ ★

★ ★ ★

## मीठ-सत्याग्रह व असहकारितेची चळवळ

यानंतरच्या लाहोर काँग्रेसमध्यें संपूर्ण स्वातंत्र्याचा ठराव करून काँग्रेसनें प्रांतिक व मध्यवर्ति विधिमंडळांवर व सरकारी समित्यांवर संपूर्ण बहिष्कार घालून जनतेस पुढील निवडणुकींत कोणत्याही तऱ्हेचा भाग न घेण्याचा व विधिमंडळांतील व इतर सरकारी समित्यांवरील काँग्रेस सभासदांस राजीनामा देण्याचा आदेश दिला.

महात्माजींनीं व्हाइसरॉयना पत्र लिहून आपला मिठाचा कायदा मोडण्याचा सत्याग्रह आरंभिला (६ एप्रिल १९३०). भराभर विधिमंडळें ओस पडलीं. लोकांनीं वकिल्या सोडल्या. शाळा–कॉलेजें रिकामीं पडलीं, सरकारी नोकऱ्याहि लोक सोडूं लागले. महात्मा गांधी वगैरे पुढारी तुरुंगांत गेले. दडपशाहीला सुरुवात झाली. चळवळींत दहशतवादी लोकांनींहि भाग घेतला. राजकीय दरोडे व खून झाले. सरकारी दडपशाहीचा नंगा नाच सुरूं होता.

## गोलमेज परिषद

सरकारनें लंडनला पहिली गोलमेज परिषद भरविली. या परिषदेंत प्रांतांना स्वायत्तता देऊन मध्यवर्ति सत्ताहि जबाबदार करण्यांत यावी असें ठरलें. शिवाय संस्थानें व ब्रिटिश मुलूख यांचें संघराज्य स्थापण्याचेंही ठरलें.

तुरुंगांतील पुढाऱ्यांची सप्रू वगैरेंनीं भेट घेऊन तडजोड करण्याचा केलेला प्रयत्न फसला. पण पुढें म. गांधी–आयर्विनतडजोड होऊन कायदेभंग मागें घेण्यांत आला व काँग्रेस-लढ्यांतील राजबंद्यांची मुक्तता

★ ★ ★

★ ★ ★

झाली. दुसऱ्या गोलमेज परिषदेंत लॉर्ड विलिंग्डन यांच्या मध्यस्थीनें कॉंग्रेसतर्फे गांधीजी हे एकमेव प्रतिनिधि गेले.

जातीय प्रश्न न सुटल्यानें ही परिषद ब्रिटिश साम्राज्यवादी कांहीं टोरीपक्षीयांच्या कारवायांनीं मोडली.

गांधीजी परत हिंदुस्थानांत येतात तों संयुक्त प्रांतांतील करबंदीची चळवळ सुरू होती. गांधीजींनीं तिला पाठिंबा दिला. गोलमेज परिषद मोडल्यानें देशांत असमाधान निर्माण झालेंच होतें. चळवळीला जोर आला. पुन्हा दडपशाही झाली.

तिसरी गोलमेज परिषद भरली (१९३२) व हिंदुस्थानला संघ राज्यघटना देण्याचें ठरलें. हिंदी संस्थानिक व ब्रिटिश मुलूख यांचा संयुक्त संघ स्थापण्याचे प्रयत्न सुरू झाले. नवा घटनाकायदा याच तत्त्वावर आधारलेला होता.

१९३४ सालीं एका शुभ्रपत्रिकेनें हिंदी घटना फेडरल राहील असें घोषित करण्यांत आलें व पार्लमेंटच्या दोन्ही सभागृहांतील प्रतिनिधींची एक संयुक्त समिती नेमण्यांत येऊन तिच्याकडे हा प्रश्न सोंपविण्यांत आला. या समितींत हिंदी प्रतिनिधींनीं सल्ला द्यावयाचा होता पण हिंदी प्रतिनिधींची एकही सूचना स्वीकारण्यांत आली नाहीं. व अखेरीस १९३५ सालीं फेडरेशनचा सल्ला अस्तित्वांत आला.

## प्रांतांना स्वायत्तता मिळाली

या कायद्यानें खालील महत्त्वाचे फरक घडून आले.

१ सर्व भारताच्या संघराज्याची कल्पना मान्य करण्यांत आली.

★ ★ ★

★ ★ ★

२ केन्द्रीय सरकारांत राखीव व सोपीव अशी खात्यांची विभागणी होऊन सोपीव कारभार लोकनियुक्त मंत्र्यांकडे देण्याचें ठरलें.

३ प्रांतांना स्वायत्तता देण्यांत आली.

४ गव्हर्नर व व्हाइसरॉय यांचे खास अधिकार, खास जबाबदाऱ्या व विधिमंडळांचे कायदे नामंजूर करण्याचा त्यांचा चालू ठेवलेला अधिकार.

## अंतिम ध्येयाला बगल

१९३५ च्या कायद्यांतील ब्रिटिश हितसंबंध, परराष्ट्रीय संबंध, अल्पसंख्याकांचें हित व शांतता आणि सुव्यवस्था यांची जबाबदारी व्हाइसरॉयवर टाकल्यानें व संरक्षण खात्याचा कारभारही व्हाइसरॉय व त्यानें नेमलेले कार्यकारी सभासद यांचेवरच सोंपविल्यानें या कायद्यानें आपणांस खरी सत्ता मिळाली अशी भ्रामक कल्पना कोणाचीही झाली नाहीं. त्यामुळें फेडरेशनला देशांतून विरोधच झाला. शिवाय फेडरेशनच्या या कायद्यानें हिंदुस्थानचा आंतरराष्ट्रीय दर्जा काय राहील ह्याबद्दल हा कायदा मुग्धच राहिला. या कायद्यास हेतुवाक्य नव्हतें. तेव्हां ब्रिटिश लोक सांगूं लागले कीं १९१९ च्या कायद्याची पुढची पायरी फेडरेशन आहे व त्यामुळें १९१९ चा कायदा रद्द झाला तरी १९१९ च्या कायद्याचें हेतुवाक्य—ज्यांत हिंदुस्थानचें अंतिम ध्येय वसाहतींचें स्वराज्य असल्याचा ब्रिटिशांनीं १९२९ सालीं निर्वाळा दिला तें—कायम आहे.

★ ★ ★

अनुक्रम विभाग ... क्रमांक ... नों. दि. 3913

★ ★ ★

## वासाहतिक स्वराज्याचा नवा अर्थ ब्रिटनला नको

हा कायदा पास होण्यापूर्वी १९३१ चा वेस्ट मिनिस्टर कायदा होऊन वसाहतींच्या स्वराज्याचा अर्थ फार व्यापक झाला होता. वसाहतींना लागू असलेला कलोनियल व्हॅलिडिटि कायदा रद्द झाल्यानें व वसाहतींतील राज्यकारभारांतील राखीव बिलें नाहींशीं झाल्यानें वसाहती वाटेल ते कायदे करण्यास स्वतंत्र झाल्या होत्या. वसाहती व साम्राज्य सरकार यांचे संबंध समान दर्जाचीं राष्ट्रें म्हणूनच चालू होते. वसाहतींस बाहेरील राष्ट्रांत वकिलाती स्थापन करण्याची मुभा मिळाली. वसाहतींना कायदे करण्याची अंतिम सत्ता मिळाल्यानें त्यांस साम्राज्यांतून फुटून जाण्याचा कायदाही संमत करण्याची कायद्यानें मुभा दिली.

वसाहतींच्या स्वराज्याच्या या विकासानें हिंदुस्थानचा वसाहतींच्या स्वराज्याचा हक्क मान्य करावा का? हा ब्रिटिश मुत्सद्यांपुढें प्रश्न होता. म्हणून १९३५च्या घटना कायद्यांत त्यांनीं हिंदुस्थानच्या दर्जाचा उल्लेखहि केला नाहीं. पुढें लॉर्ड बाल्डविन यांनीं हिंदुस्थानचा दर्जा वसाहतींच्याहून कमी नाहींच. तसा तो ठेवणें म्हणजे ब्रिटिश सत्ता अपेशी आहे असें कबूल करणें होय असा निर्वाळा दिला.

दर्जाचा प्रश्न मुग्धांतच ठेवून व फेडरेशनचा मध्यवर्ति सरकारचा भाग बाजूला ठेवून सरकारनें १ एप्रिल १९३७ पासून प्रांतिक स्वायत्तता राबविण्याचें ठरविलें. सुधारणा सदोष असल्या तरी त्या हाणून पाडण्यासाठीं १९३१ च्या व ३४ च्या निवडणूक जाहीरनाम्यांत उद्घोषित केलेली स्वतंत्र घटनासमितीची मागणी पुरी करण्यासाठीं

★ ★ ★

★ ★ ★

कॉंग्रेसनेंही निवडणुका लढविण्याचें ठरविलें. व अकरांपैकीं ६ प्रांतांत निर्विवाद बहुमत मिळविलें.

## गव्हर्नरचे जादा अधिकारांबाबत पेंचप्रसंग

कायद्यानें गव्हर्नरला दिलेले जादा अधिकार व नकार न वापरण्याचें आश्वासन दिल्यासच मंत्रिमंडळें बनविण्यास कॉंग्रेस तयार होती. शांतता सुव्यवस्था, अल्पसंख्यांकांचें हितसंरक्षण वगैरेंबाबत गव्हर्नरला जादा अधिकार असल्यानें जबाबदारीच्या प्रांतिक स्वायत्ततेला अर्थच नव्हता. तेव्हां गव्हर्नरकडून आश्वासन मागून त्यांस घटनात्मक प्रमुख बनवून खऱ्या अर्थानें प्रांतिक स्वायत्तता व जबाबदार राज्यपद्धति कॉंग्रेसला सुरू करावयाची होती.

"प्रत्येक प्रांतांतील असेंब्ली-कॉंग्रेस-पक्षाच्या नेत्याचें समाधान झालें असलें व ढवळाढवळ करण्याचें अगर मंत्र्यांच्या घटनात्मक व्यवहारांत त्यांचा सल्ला झिडकारण्याचें गव्हर्नरनें आपले जादा अधिकार न वापरण्याचें ठरविल्याचें जाहीर अभिवचन जर नेता देऊं शकला तर प्रांतांत मंत्रिमंडळें स्थापावीं असें १८ मार्च १९३७ ला भरलेल्या अ. भा. कॉं. कमिटींत एकमतानें ठरलें.

मुंबई, मद्रास, ओरिसा व मध्यप्रांताचे गव्हर्नरनीं तसें आश्वासन देण्याचें नाकारलें व संयुक्त प्रांताचे गव्हर्नरनें घटना कायद्यानें गव्हर्नरना तसें आश्वासन देतां येत नसल्याचें कळविलें. कायद्यानें गव्हर्नरवर टाकलेली जबाबदारी बाजूला सारतां येणार नाहीं असें बिहार गव्हर्नरनें कळविलें.

★ ★ ★

★ ★ ★

## काँग्रेस-मंत्रिमंडळाचा कारभार

यामुळें प्रांतांत मंत्रिमंडळें बनूं शकलीं नाहींत. गव्हर्नरनीं अल्पसंख्यांक सभासदांच्या सहाय्यानें कामचलाऊ सरकारें स्थापन केलीं.

पुढें गांधी–व्हाइसरॉय पत्रव्यवहार झाला. प्रांतांतील बहुमतवाल्या पक्षाशीं शक्य तर मिळतें घेऊन राज्यकारभार विनाकटकट चालविणेंच देशाच्या हिताचें असल्याचें व हा कायदा यशस्वी करण्यासाठीं बहुमत-वाल्या पक्षाचें सहकार्य शेवटीं सरकारला लागणार असल्यानें गव्हर्नर आपल्या अधिकाराचा दुरुपयोग करणार नाहींत असें आश्वासन व्हाइसरॉयनीं आपल्या २१ जून १९३७ च्या पत्रांत दिलें. त्यामुळें निर्माण झालेला पेचप्रसंग सुटला व काँग्रेस-मंत्रिमंडळें अधिकारावर आलीं. त्यांनीं आपला जनहिताचा कार्यक्रम सुरू केला. प्रांतिक मंत्र्यांचे हात घटनेनें बांधले होते. गव्हर्नरनें आपले खास अधिकार न वापरण्याचें आश्वासन दिलें असलें तरी त्या आश्वासनांस कांहीं मर्यादेपर्यंतच किंमत होती. शिवाय प्रांतिक खातें-वांटणीच इतकी चुकीची होती कीं, शिक्षण, आरोग्य, लोकहिताचीं कामें, वगैरेसारखीं जादा खर्चाचीं खातीं प्रांतिक होतीं. पण उत्पन्नाचे बाजूस जमीन-महसुलाव्यतिरिक्त मोठें खातें नव्हतें. शिवाय प्रांतिक उत्पन्नापैकीं जवळजवळ एक-पंचमांश भागावर लोकप्रिय मंत्र्यांचा ताबा नव्हताच. त्याची विल्हेवाट लावण्याचा अधिकार गव्हर्नरचा होता. शिवाय प्रांतिक गव्हर्नरही ज्या बाबतींत ग. ज. च्या हुकमतीखालीं होता तेथेंही प्रांतांच्या स्वायत्ततेस बाध येत होताच.

## फेडरेशनला विरोध कायम

प्रांतिक स्वायत्तता राबविण्याचें काम चालू असलें तरी संघ-राज्य

★ ★ ★

★ ★ ★

स्थापन करण्यास काँग्रेसची तयारी नव्हती. ज्या राज्यकारभारांत व्हाइसरॉयला व्यापक अधिकार आहेत, जेथें संपूर्ण जबाबदारीचें तत्त्व नाहीं अशी घटना काँग्रेसला नको होती. त्यांतच १९३८ सालीं राजबंद्यांच्या मुक्ततेच्या प्रश्नावर संयुक्तप्रांत व बिहारमध्यें काँग्रेस मंत्रिमंडळांनीं राजीनामे दिले होते. पुढें व्हाइसरॉय-गांधीजी पत्रव्यवहारानें तो पेंचप्रसंग सुटला असला तरी त्यामुळें गव्हर्नरच्या जादा अधिकारांच्या व्याप्तीची कल्पना देशास आली होती. दरवर्षीच्या काँग्रेस अधिवेशनांत फेडरेशनच्या धिक्काराचे ठराव पास होत होते.

## प्रांतिक स्वायत्ततेवर घाला

मंत्रिमंडळें स्थापून पुरीं दोन वर्षे होतात न होतात तोंच महायुद्ध सुरू झालें. ब्रिटिश पार्लमेंट हिंदुस्थानला कांहींहि देण्यास तयार नव्हतें. कदाचित् युद्ध होऊन पेंचप्रसंग निर्माण झाल्यास केन्द्रीय अधिकाऱ्यां-मार्फत प्रांतांचा कारभार चालविण्याची सोय व्हावी म्हणून १९३५ च्या घटना-कायद्यांत पुढील दुरुस्ती करण्यांत आली.

‘ गव्हर्नर जनरलनें आणीबाणीची परिस्थिति निर्माण झाल्याचें जाहीर करून हिंदी सुरक्षिततेस युद्धामुळें धोका पोंचण्याची शक्यता त्यांनीं जाहीर केल्यास, मध्यवर्ति सरकार शाही नोकरांकडून प्रांतिक कारभारांतही ढवळाढवळ करूं शकेल. तसेंच अशा आणीबाणीच्या वेळीं व्हाइसरॉयला प्रांतिक कारभार कसा चालवावा याबद्दल प्रांतिक सरकारला हुकूम करतां येतील.’

या दुरुस्तीनें प्रांतिक स्वायत्तता किती तकलुबी आहे हें प्रत्ययास आलें.

★ ★ ★

★ ★ ★

युद्ध सुरू होतांच व्हाइसरॉयनीं भारत संरक्षण कायदा मंजूर केला व मध्यवर्ति सरकारनें आणीबाणीची स्थिति जाहीर करून ब्रिटिश हिंदुस्थानच्या संरक्षणासाठीं, जनतेच्या सुरक्षिततेसाठीं तसेंच देशांत शांतता राखण्यासाठीं अगर युद्धप्रयत्न सुरळीत चालावा व जनतेस जीवन-वस्तूंचा पुरवठा व्हावा म्हणून निरनिराळे वटहुकूम काढले. प्रांतिक स्वायत्ततेवर नियंत्रणें आणलीं.

## युद्धहेतू जाहीर करण्याची मागणी

युद्ध सुरू होतांच इंग्लंडबरोबर आपोआप हिंदुस्थान सरकारनेंही युद्धघोषणा केली. पण नुसत्या अधिकृत घोषणेनें युद्धसहकार्य मिळत नाहीं. तें सहकार्य मिळण्यासाठीं व्हाइसरॉयच्या कार्यकारिणींत देशांतील जबाबदार पुढाऱ्यांनीं सहकार्य करावें म्हणून ताबडतोब बोलणीं सुरू झालीं.

कॉंग्रेस वर्किंग कमिटीनें ८ सप्टेंबरपासून सुरू झालेल्या आपल्या बैठकींत 'सरकारनें आपले युद्धहेतू जाहीर करावे व युद्ध संपतांच हिंदुस्थानला आपली घटना बनविण्याचा अधिकार देण्यांत येईल' अशीं आश्वासनें मागितलीं.

व्हाइसरॉयनीं १७ ऑक्टोबर १९३९ ला भाषण करून युद्धोत्तर काळांत १९३५ च्या घटना कायद्यांत योग्य ते फेरफार सुचविण्यासाठीं सरकार सर्वपक्षीय परिषद बोलावील असें आश्वासन दिलें. त्याचबरोबर अल्पसंख्याकाच्या हितसंबंधांची पूर्ण काळजी घेतली जाईल असेंहि आश्वासन त्यांनीं दिलें.

★ ★ ★

★ ★ ★

काँग्रेसचें यानें समाधान न झाल्यानें ६ प्रांतांतील काँग्रेस मंत्रि-मंडळांनीं अधिकारत्याग केला. फक्त आसाममध्यें गव्हर्नरला मंत्रिमंडळ बनवतां आलें. बाकीच्या पांच प्रांतांतून गव्हर्नरनें घटनात्मक पेचप्रसंग जाहीर करून १९३५ च्या घटना कायद्यांतील ९३ व्या कलमाचा आधार घेऊन आपला अनियंत्रित कारभार स्थापन केला.

## ३५ च्या कायद्याला मूठमाती

आपली फेडरल घटना टाकाऊ कां आहे याचें एक प्रमुख कारण तींतील ९३ वें कलम आहे. या कलमान्वयें गव्हर्नर जनरलच्या सल्ल्यानें गव्हर्नर पेचप्रसंग जाहीर करून आपल्या ताब्यांत हायकोर्टाव्यतिरिक्त इतर कोणतेंही काम घेऊं शकतो. कारभार हातांत घेतल्याचें जाहीर केल्यावर त्यानें भारतमंत्र्यास कळविलें म्हणजे झालें. भारतमंत्री पार्लमेंटकडून त्यास

---

" I have been authorised by his Majesty's Government to say that at the end of the war they will be very willing to enter into consultation with the representatives of the several communities, parties and interests in India and with the Indian Princes, with a view to securing their aid and cooperation in framing such modifications ( of the Act of 1935 ) as may seem desirable. "

The Viceroy's Statement on Oct. 17 1939.

★ ★ ★

★ ★ ★

संमति घेववितो. व पार्लमेंटच्या संमतीनें हा कारभार ३ वर्षें सतत चालवितां येतो.

या कलमाचा उपयोग फक्त आणीबाणीच्याच वेळीं अगदीं नाइलाजानें करावयाचा होता; पण घटना राबविण्यास सुरुवात होऊन २ वर्षें होतांच सात प्रांतांच्या गव्हर्नरांवर ती पाळी आली. अशा रीतीनें प्रांतांची स्वायत्तता नामशेष करणारें असें कलम नव्या घटनेंतच ठेवलें आहे हा मोठाच या घटनेंतील दोष होय.

सात प्रांतांतील गव्हर्नरची राजवट तीन वर्षांनंतरही संपली नाहीं. त्यासाठीं १९४२ सालीं खास कायदा करून या राजवटीस युद्धसमाप्ती-नंतर १२ महिनेपर्यंत कायदेशीर जीवदान मिळालें !

## काँग्रेसची निःसंदिग्ध मागणी

काँग्रेसनें मंत्रिमंडळांचा त्याग केल्यावर देशांत अस्वस्थता माजली. समाजवादी व फॉरवर्ड ब्लॉकचे लोक यांनीं चळवळीची मागणी केली. गांधीजी व्हाइसरॉयशीं मुलाखती करीत होते; पण १९३९ च्या डिसेंबर-पर्यंत कांहींहि समाधानकारक उत्तर मिळालें नाहीं.

" काँग्रेस साम्राज्यशाहीच्या संरक्षणासाठीं लढणार नाहीं. पण स्वातं-त्र्याच्या लढ्यांत निश्चित भाग घेईल. फक्त स्वतंत्र हिंदुस्थानच स्वेच्छेनें यांत सहकार्य करूं शकेल." पं. नेहरू यांनीं ऑक्टोबर १९३९ मध्यें 'न्यूज क्रॉनिकल' या ब्रिटिश समाजवादी पक्षाच्या अधिकृत साप्ताहिकास संदेश देतांना काँग्रेसचा सहकार्याचा हा दृष्टिकोन स्पष्ट केला. पण या अटी मान्य होण्याची आशा नव्हती.

★ ★ ★

★ ★ ★

मुस्लिम लीग व कॉंग्रेस यांतील भेद वाढत जात होते व व्हाइसरॉय लीगचा "मुसलमानांची एकमेव प्रातिनिधिक संस्था" हा हक्क मान्य करीत होते.

## अल्पसंख्यांकांचें बुजगावणें

लीगमार्फत व्हाइसरॉयनीं अल्पसंख्याकांवरील अन्यायाचें बुजगावणें पुढें केलें व ताबडतोब राष्ट्रीय सरकारची स्थापना करण्याची राष्ट्रसभेच्या पुढाऱ्यांची मागणी अमान्य केली.

१९४० च्या जानेवारींत मुंबईस ओरिएंट क्लबांत भाषण करून व्हाइसरॉयनीं सर्व पक्षांस न्याय मिळवून देईन असें आश्वासन दिलें व पक्षप्रमुखांनीं आपसांतील मतभेद मिटवावे असें सुचविलें. या भाषणानें निर्माण झालेली आशा एक महिन्याचे आंतच विरली. रामगढच्या अधिवेशनांतील ठरावानंतर कॉंग्रेस लढा पुकारणार हें निश्चित झाल्यासारखें होतें. कांहीं प्रांतांत सत्याग्रहाच्या तयारीस सुरुवात झाली; व कॉंग्रेसच्या लोकांस पकडून त्यांच्यावर खटले भरण्यांत आले.

१९४० च्या मार्चमध्यें लीगनें आपला पाकिस्तानचा ठराव केला.

देशांतील हिंदुमुसलमान तेढ वाढतच होती. जातीजातींत एकमत होणें दुरापास्त झालें होतें व सरकार तर सारखें म्हणत होतें, 'तुम्ही एक व्हा आणि आमच्याकडे या.'

★ ★ ★

# ५ : : रणक्षेत्रांतून स्वातंत्र्य-मंदिराकडे

★ ★ ★

ब्रिटिश लोक हिंदी स्वातंत्र्याची मागणी टोलवीत असले तरी युद्धाची भीषणता त्यांस स्वस्थ बसूं देत नव्हती. १९४० च्या जुलैच्या सुरुवातीस व्हाइसरॉय सर्व पक्षप्रमुखांस भेटले व तडजोड निघते का पाहूं लागले.

७ जुलैला कॉंग्रेस कार्यकारिणीची खास बैठक भरली. "ब्रिटिशांनीं हिंदुस्थानला स्वातंत्र्य देणार असल्याची निःसंदिग्ध घोषणा ताबडतोब करावी व मध्यवर्ति विधिमंडळांतील सर्व प्रतिनिधींच्या विश्वासास पात्र असें हंगामी राष्ट्रीय सरकार ताबडतोब स्थापन करावें आणि सरकारनें स्वायत्त प्रांतिक सरकारांकडून जास्तींत जास्त सहकार्य मिळवावें" असा ठराव या बैठकींत पास झाला.

★ ★ ★

★ ★ ★

## हंगामी राष्ट्रीय सरकारची मागणी

हंगामी राष्ट्रीय सरकारची मागणी, आणि वसाहतींच्या स्वराज्याची नव्हे तर स्वयंनिर्णयाचे तत्त्वावर, संपूर्ण स्वातंत्र्याची मागणी करणारा ठराव कॉंग्रेसनें केला. आतां देशांत कॉंग्रेसचीं मंत्रिमंडळें नव्हतीं तेव्हां लढा निश्चित होणार होता. हा लढ्यापूर्वीचा निर्वाणीचा खलिता होता. येथपासून देशांत एका नव्या कालखंडास सुरुवात झाली.

## पुढील तारखेचा चेक

७ ऑगस्ट १९४० ला सिमल्याहून व्हाइसरॉयनीं एक पत्रक काढून कांहीं हिंदी लोकांच्या प्रतिनिधींचें व्हाइसरॉयच्या कार्यकारिणीवर सहकार्य मागितलें. तसेंच हिंदी लोकप्रतिनिधि, संस्थानिक व सरकार यांचें संयुक्त युद्ध-सल्लागार मंडळ बनविण्याचा सरकारचा मानस असल्याचें जाहीर केलें. या वेळीं व्हाइसरॉयनीं भावी घटनेबाबत वक्तव्य करून त्यांत हिंदी लोकांची तळी उचलून धरली. ते म्हणाले, " ज्या सरकारला देशांतील महत्त्वाच्या घटकांचा विरोध असेल असें सरकार प्रस्थापित करण्याचा सरकारचा मानस नाहीं. असें सरकार स्थापून अल्पसंख्यांकांवरील जुलमाला आम्हीं मान्यता देणार नाहीं."

युद्ध संपतांच नवी घटना बनविण्यासाठीं हिंदी लोकांच्या प्रतिनिधींची समिति बोलाविण्यास सरकारची मान्यता आहे. हिंदी घटना हिंदी लोकांनींच तयार केली पाहिजे हें तत्त्व आम्हांस मान्य आहे. ती करतांना ब्रिटिश सरकारवर आजवरच्या राज्यकारभारामुळें ज्या कांहीं जबाबदाऱ्या पडल्या आहेत त्या पाळल्या जातील एवढी दक्षता सरकार घेईल.

★ ★ ★

★ ★ ★

## वैयक्तिक सत्याग्रह

सरकारच्या इच्छेप्रमाणें हिंदी लोकप्रतिनिधींचें कार्यकारिणीवर सहकार्य मिळणें शक्यच नव्हतें. या भाषणानें कॉंग्रेसच्या हंगामी राष्ट्रीय सरकारच्या मागणीस व्हाइसरॉयनीं नकार दिला होता. शिवाय घटना-स्वातंत्र्याचे आश्वासनांत सुद्धां ब्रिटिशांच्या जबाबदाऱ्या कोंबल्या होत्याच. त्या 'जबाबदाऱ्यां'तून अल्पसंख्यांकांचे हितसंबंध, संस्थानिक वगैरे बुजगावणीं निघतील अशी रास्त भीति वाटत होती. कॉंग्रेसनें ही व्हाइसरॉयची योजना झिडकारली; व ब्रिटिशांचा निषेध करण्याचा जनतेस आदेश दिला.

वाटाघाटी फिसकटल्यानें असंतोष वाढला. युद्धपरिस्थिति चिघळत होती व असंतोष फैलावत होता. हिंदी लोक उघड उघड युद्ध-विरोधी भाषणें करीत होते. सरकारन भाषणबंदी जारी केली. कॉंग्रेसनें गांधीजींच्या नेतृत्वाखालीं वैयक्तिक सत्याग्रहाची मोहीम उघडली. लोक युद्धविरोधी भाषणें करून सत्याग्रह करूं लागले.

## कार्यकारिणीवर हिंदी-बहुमत

व्हाइसरॉयला युद्धाच्या वाढत्या ज्वाळांना जनतेच्या सहकार्याविना तोंड देणें कठीण जाऊं लागलें. व्हाइसरॉयच्या कार्यकारिणींतील आठ मंत्र्यांच्या मदतीस आणखी पुरवठा, प्रचार, मजूर, अंतर्गत संरक्षण व वसाहत-संबंध हीं खातीं नव्यानें निर्माण करण्यांत येऊन त्यांचे दावणीस कांहीं हिंदी लोकांस बांधण्यांत आलें. यामुळें या कार्यकारी कौन्सिलांत पाहिल्यानेंच हिंदी बहुमत झालें. या खातेवाढीमुळें कोणाचेंच समाधान झालें नाहीं.

★ ★ ★

★ ★ ★

कार्यकारिणीस नवे अधिकार कांहींच नव्हते. उलट व्हाइसरॉयांच्या वरील संरक्षण, अल्पसंख्यांकांचें हितसंबंधरक्षण वगैरे जबाबदाऱ्या वाढल्यानें कार्यकारिणी व्हाइसरॉयच्या होयबांनीं भरली.

## अटलांटिक सनदेचाही हिंदुस्थानला फायदा नाहीं

सर्व राष्ट्रांची घटना ठरविण्याचा अधिकार आम्हांस मान्य असून, ज्या राष्ट्रांचें स्वातंत्र्य सक्तीनें अपहरण करण्यांत आलें होतें त्यांस पुन्हां स्वतंत्र झालेले आम्ही पाहूं अशा आशयाची एक घोषणा प्रे. रूझवेल्ट व ब्रिटिश पंतप्रधान चर्चिल यांमध्यें झालेल्या वाटाघाटींनंतर त्या दोघांतर्फे करण्यांत आली तीस 'अटलांटिक सनद' म्हणतात. ही सनद हिंदुस्थानला लागू नसल्याचें ब्रिटिश पंतप्रधानांनीं पार्लमेंटांतील एका प्रश्नास उत्तर देतांना जाहीर केलें यामुळें हिंदुस्थानांत फारच असंतोष माजला.

## क्रिप्स-शिष्टाई

जपानच्या युद्धप्रवेशानें हिंदुस्थानच्या सरहद्दीवर युद्ध आलें. अमेरिका व चीन येथूनही हिंदी धोरणांत बदल करण्याच्या मागण्या होऊं लागल्या. युद्धप्रयत्नास आवश्यक म्हणून पुन्हां तडजोडीचीं चक्रें फिरूं लागलीं. ब्रिटिश मंत्रिमंडळानें एक मसुदा केला व तो सर स्टॅफर्ड क्रिप्स या समाजवादी व पं. नेहरूंचा मित्र असलेल्या मंत्र्यानें हिंदुस्थानांत आणिला ( मार्च १९४२ ). दिल्लीस वाटाघाटी सुरू झाल्या व शेवटीं संरक्षणाच्या ताब्याबाबत मतभेद होऊन त्या फिसकटल्या.

या योजना मांडतांना हिंदुस्थानांत लवकरांत लवकर, इतर

★ ★ ★

★ ★ ★

वसाहतींच्या दर्जाची राज्यघटना स्थापन करण्याचा सरकारचा मानस असल्याचें निःसंदिग्ध भाषेंत नमूद करण्यांत आलें होतें. व त्यासाठीं खालील योजना मांडली होती—

( १ ) घटना तयार करण्यासाठीं लोकप्रतिनिधींचें एक मंडळ स्थापन करण्याची तयारी युद्ध संपतांच सुरू करण्यांत येईल.

( २ ) घटनासमितींत हिंदी प्रतिनिधींना भाग घेण्याची तरतूद करण्यांत येईल.

( ३ ) घटनासमितीनें तयार केलेली घटना ब्रिटिश सरकार तावड-तोब मान्य करील. मात्र एखाद्या प्रांताला घटनेंतील हिंदी संघराज्यांत यावयाचें नसेल तर त्यावर सक्ती करण्यात येणार नाहीं. तसेंच जर असे प्रांत आपल्यासाठीं स्वतंत्र संघराज्य स्थापन करणार असतील तर त्यासही सरकार मान्यता देईल. हिंदी संघराज्यांत येण्याची अगर त्यांतून बाहेर पडण्याची कोणाही घटकास केव्हांही मुभा राहील. घटना-परिषद ब्रिटिश सरकारशीं तह करील. मात्र तह करतांना ब्रिटिश सरकारनें वांशिक व धार्मिक अल्पसंख्यांकांच्या संरक्षणाची घेतलेली जबाबदारी लक्षांत घेतली जाऊन ती योग्य रीतीनें पाळली जाण्याची दक्षता घेतली जाईल.

## युद्धसहाय्य मिळविण्यासाठीं कारवाई

यानंतरच्या भागांत घटनासमितीच्या सभासदांची निवड युद्धसमाप्ती-नंतर नव्यानें निवडून आलेल्या प्रांतिक विधिमंडळामार्फत केली जाईल व सभासद प्रांतिक सभासदांच्या संख्येच्या एक-दशांश रहातील; हिंदी संस्थानिकांस याच प्रमाणांत आपले प्रतिनिधि नेमून पाठविण्यास

★ ★ ★

★ ★ ★

सांगण्यांत येईल; संस्थानिकांशीं झालेले करारनामे बदलावे लागतील वगैरे कलमें होतीं.

" नवीन घटना अस्तित्वांत येईपर्यंत साम्राज्य सरकारवरच या राष्ट्राच्या संरक्षणाची जबाबदारी आहे व त्या दृष्टीनें संरक्षणखात्यावरील ताबा व अधिकार ब्रिटिश सरकारचा राहील. मात्र हिंदुस्थानकडून भरपूर युद्धसहाय्य होण्याची खबरदारी हिंदुस्थान सरकारनें स्वीकारली पाहिजे. हिंदी लोकप्रतिनिधींनीं देशाच्या कारभारांत तावडतोब सहकार्य करून मातृभूमि, साम्राज्य व दोस्तराष्ट्रें यांचे कारभारांत आपले सल्लयाची मदत द्यावी अशी आमची कळकळीची इच्छा असून आम्ही हिंदी लोकांस त्यासाठीं निमंत्रितों. निमंत्रणाचा स्वीकार करून हिंदी स्वातंत्र्यास आवश्यक अशा मोठ्या जबाबदारींत ते आपला वांटा उचलतील. "

## स्वयंनिर्णयाला मान्यता

वरील योजनेचे दोन भाग पडतात. एक भावी घटनेचा; हिंदुस्थानचा स्वयंनिर्णयाचा हक्क मान्य केला गेल्यानें सर्वपक्षीयांस समाधान झालें. अर्थात् अल्पसंख्यांकांचें हित, संस्थानी प्रजेला प्रतिनिधित्व नाहीं व प्रांतांना फुटून निघण्याचा आरंभापासूनच मिळणारा अधिकार हे त्यांतील ढोबळ दोष होतेच. विशेषतः प्रांतांचा फुटून निघण्याचा अधिकार हिंदी ऐक्याला अगदींच विघातक होता. पण ब्रिटिश सरकारनें हिंदुस्थानचा स्वयंनिर्णयाचा हक्क निःसंदिग्धपणें मान्य केला.

दुसरा भाग हंगामी सरकारबाबतचा होता व तो तात्कालिक दृष्ट्या विशेष महत्त्वाचा होता.

★ ★ ★

★ ★ ★

## टाकाऊ हंगामी योजना

संरक्षणाव्यतिरिक्त सर्व खात्यांचा कारभार हिंदी प्रतिनिधींकडे जावयाचा होता. संरक्षणांतील सुद्धां फक्त युद्धकारभार व सैन्यावरील ताबा हिंदी सरसेनापतींकडे ठेवून बाकीचा भाग हिंदी मंत्र्यांकडे देण्यासहि क्रिप्सची तयारी होती; पण महत्त्वाचा मुद्दा खऱ्या सत्तादानाचा होता. नवें हंगामी सरकार खऱ्या अर्थानें राष्ट्रीय होणार का आपलें व्हाइस-रॉयच्या कार्यकारिणीला जरा मोठें नांवच फक्त दिलें जाणार होतें? खऱ्या अर्थानें सरकार राष्ट्रीय होण्यास व्हाइसरॉय नामधारी झाले पाहिजेत. त्यांचे नकार, जादा अधिकार वगैरे सर्व निकालांत निघाले पाहिजेत. पण तसा घटनात्मक फरक करण्यास ब्रिटिश सरकारनें नकार दिला व या वाटाघाटी फिसकटल्या.

## साम्राज्यवाद्यांचें तांडवनृत्य

झालें! देशांत पसरलेलें आशेचें वातावरण लुप्त झालें. ब्रिटिशांचे-बद्दल द्वेष वाढला. जपानी आक्रमण जास्त झपाट्यानें होत गेलें. ब्रिटिश साम्राज्यशाही जपानी आक्रमणास तोंड देण्यास असमर्थ असल्याचें दिसलें होतें. हिंदुस्थानच्या भूमीवर विजगापट्टण, कोकोनाडा, कॉक्स बझार वगैरे ठिकाणीं बॉबहल्ले झाले. दोस्तांची सर्व ठिकाणीं पीछेहाट होत होती. दोस्तांनीं लोकशाहीसाठीं युद्ध पुकारल्याची ग्वाही दिली होती; पण नेमक्या त्याच लोकशाहीची आणि स्वातंत्र्याची हिंदुस्थानांत गेलीं दीडशें वर्षें गळचेपी होत होती. हिंदी राष्ट्रानें कॉंग्रे-सच्या नेतृत्वाखालीं 'चले जाव' लढा पुकारून नादान साम्राज्यशाहीस हांकून लावण्यासाठीं अहिंसक लढा पुकारला. साम्राज्यशाहीनें प्रक्षोभक

★ ★ ★

★ ★ ★

लाठीहल्ले करून निरपराध जनतेवर गोळ्या झाडून लोकांचे पुढारी विनाचौकशी व त्यांना नकळत त्यांचेपासून हलवले. जनतेनें नेत्याविना साम्राज्यशाहीच्या अत्याचारांना वीरोचित तोंड दिलें !

दरम्यान असेंब्लींतील पुढारी श्री. भुलाभाई देसाई व लियाकतअली-खान यांनीं कॉंग्रेस-लीग समझौत्याचा मसुदा तयार केला. अपक्षपरिषदे-मार्फतही पेंचप्रसंग सोडविण्याचे प्रयत्न झाले; पण महात्माजी व पं. नेहरू प्रभृति कॉंग्रेस वर्किंग कमिटीच्या पुढाऱ्यांविना तडजोड अशक्य होती. लॉर्ड वेव्हेल यांनीं १९४५ च्या जूनमध्यें कॉंग्रेस कार्यकारिणीची मुक्तता करून देशांत निर्माण झालेला पेंचप्रसंग सोडविण्याचा प्रयत्न केला.

## अयशस्वी सिमला परिषद्

जर्मनीच्या पराभवानंतर जपानचा त्वरित पराभव करण्यांत हिंदुस्थाननें सहभागी व्हावें म्हणून व्हाइसरॉय लॉर्ड वेव्हेल यांनीं विलायतची वारी करून एक योजना आंखली.

सर्वप्रांतिक पंतप्रधान, वरिष्ठ विधिमंडळांतील कॉंग्रेस लीग व युरोपियन गटांचे नेते वा उपनेते, कॉंग्रेसतर्फे गांधीजी व लीगतर्फे जीना यांना सिमल्यास निमंत्रण केलें. तेथें हंगामी सरकार स्थापण्याची नवी योजना सादर झाली. त्यांत संरक्षणाव्यतिरिक्त सर्व खातीं हिंदी सभासदांकडे जाणार होतीं. व्हाइसरॉयनें आपला नकाराचा खास अधिकार फारसा न वापरण्याचें ( use it sparingly ) कबूल केलें होतें. सभासदांची वांटणी खालीलप्रमाणें ठरली. मुसलमान व सवर्ण हिंदू यांस समप्रतिनिधित्व व इतर अल्पसंख्यांकांस स्वतंत्र प्रतिनिधित्व देण्याचें व्हाइसरॉयनीं सुचविलें.

★ ★ ★

★ ★ ★

लीगनें सर्व मुसलमान प्रतिनिधि निवडण्याचा आपला हक्क आहे असा आग्रह धरला. तसेंच कॉंग्रेसला फक्त सवर्ण हिंदूंचें प्रतिनिधित्व देऊन कॉंग्रेसच्या राष्ट्रीय भूमिकेस हरताळ फांसण्याचा प्रयत्न लीग व सरकारनें केला. त्यास कॉंग्रेसची मान्यता मिळाली नाहीं. सिमला परिषद मोडली.

पुढें जपानच्या शरणागतीनंतर हिंदुस्थानची घटना ठरविण्याची वेळ आली आहे असें लोकमत झालें. इंग्लंडमध्यें इतिहासांत अपूर्व अशी घटना घडली. नव्या निवडणुकांत मजूरपक्षाला निर्विवाद व प्रचंड बहुमत मिळालें. लॉर्ड वेव्हेल्नीं पुन्हा लंडनची वारी केली. व तेथून परत आल्यावर १५ सप्टेंबर १९४५ ला असें घोषित केलें कीं, हिंदी घटना परिषद लवकरच बोलावली जाईल व तिला १९४२ चीं क्रिप्स योजना मान्य आहे का ? त्यांत काय सुधारणा पाहिजे ? अगर कांहीं नवी योजना आहे ? यांचा विचार करण्यास सांगण्यांत येईल. घटनासमिति बोलावण्यासाठीं पहिल्या प्रथम प्रांतिक व मध्यवर्ति विधिमंडळांच्या निवडणुका करण्यांत येतील. निवडणुकांनंतर मध्यवर्ति विधिमंडळांतील प्रमुख पक्षांचा पाठिंबा असलेलें कार्यकारी कौन्सिल नेमून घटना परिषदेसंबंधानें वाटाघाटी करण्याचा सरकारचा मानस असल्याचेंहि व्हाइसरॉयनीं घोषित केलें.

## निवडणुकांचें फल

नव्या निवडणुका मार्चच्या सुरुवातीस झाल्या. सर्व ठिकाणच्या निवडणुकांत सर्वसाधारण जागा कॉंग्रेसनें काबीज केल्या व मुसलमान जागा लीगनें काबीज केल्या. जशा सर्वसाधारण जागा कॉंग्रेसबाहेर

★ ★ ★

★ ★ ★

फारच तुरळक प्रमाणांत गेल्या, तशाच मुस्लिम जागा लीगबाहेर फारच थोड्या प्रमाणांत गेल्या. याला अपवाद सरहद्द प्रांत ठरला. तेथें मुस्लिम जागा पटकावण्यांतही काँग्रेसनें आघाडी मारली. प्रांतिक निवडणुका झाल्यानंतर मुंबई, मद्रास, मध्य, संयुक्त, बिहार, ओरिसा, आसाम व सरहद्द या प्रांतांत काँग्रेसला निर्विवाद बहुमत मिळून काँग्रेसचीं मंत्रिमंडळें स्थापन झालीं. पंजाबमध्यें काँग्रेसनें संमिश्र मंत्रिमंडळ स्थापिलें.

बंगाल व सिंध यांमध्येंच फक्त लीगचीं मंत्रिमंडळे आहेत. पण तेथें त्यांस निर्विवाद बहुमत नाहीं.

या निवडणुकांनीं काँग्रेस व लीग हे दोनच पक्ष हिंदी राजकारणांत आहेत हें सिद्ध झालें.

प्रांतिक कारभार लोकनियुक्त मंत्र्यांकडे गेल्यानें गेलीं जवळ जवळ ७ वर्षें देशांतील राज्यकारभारांत निर्माण झालेला पेंचपसंग सुटला. व प्रांतिक स्वायत्तता व प्रांतिक राज्यकारभारांत जबाबदारीचें तत्त्व पुन्हां सुरू झालें.

नव्या निवडणुकांनंतर साहजिकच घटनात्मक फेरबदल व मध्यवर्ति हंगामी सरकार यांवर जनतेचें लक्ष केंद्रित झालें.

## त्रिमंत्र्यांची योजना

युद्धोत्तर जगांत लोकशाही तत्त्वांचा झालेला फैलाव, हिंदुस्थानांतलि नाविकबंड, व अझाद हिंद खटले यावेळीं दृश्य झालेला तीव्र असंतोष व हिंदी लोकांची स्वातंत्र्य-लढयाची तयारी, जागतिक राजकारणांत

★ ★ ★

★ ★ ★

स्वतंत्र हिंदुस्थान ब्रिटनचे बाजूनें रहावा म्हणून ब्रिटनची धडपड; यामुळें पुन्हां हिंदुस्थानच्या चिरकालीन घटनेचा विचार करणें मजूर सरकारला आवश्यक वाटलें.

पार्लमेंटांतील निरनिराळ्या पक्षांच्या सभासदांचें एक शिष्टमंडळ हिंदुस्थानांतील परिस्थितीचें निरीक्षण करून गेलें होतें.

पंतप्रधान ॲटलींनीं आपल्या भाषणांत म्हटल्याप्रमाणें हिंदुस्थानांत राष्ट्रीय भावना जागृत झाली होती. युद्धोत्तर आर्थिक व सामाजिक प्रश्न सोडविण्यास हिंदी लोकच जास्त लायक होत त्यामुळें त्यांच्या हातीं देशाचा कारभार ताबडतोब सोंपविण्यास मदत करण्यासाठीं म्हणून मंत्रिशिष्ट हिंदुस्थानला आले. ते निघाले त्याच वेळीं यशस्वी होऊनच परत जाण्याचा निश्चय त्यांनीं केला होता.

मंत्रिशिष्ट पाठवितांना पंतप्रधानांनीं अल्पसंख्याकांबाबत केलेला खुलासा विशेष महत्त्वाचा आहे. पंतप्रधानांनीं अल्पसंख्याकांना निर्भयतेनें रहातां यावें असें प्रतिपादलें, पण त्याचबरोबर बहुसंख्याकांच्या प्रगतीस खीळ घालण्याचा हक्क अल्पसंख्याकांस देतां येणार नाहीं. तसेंच यावेळीं

---

"We are mindful of the rights of the minorities and the minorities should be able to live free from fear. On the other hand we cannot allow a minority to place their veto on the advance of a majority."

Atlee's Speech, 15th March 1946.

★ ★ ★



५

★ ★ ★

स्वतंत्र हिंदुस्थानवर अल्पसंख्यांकांच्या हितसंरक्षणासाठीं ब्रिटिशांची करडी नजर रहाणार नाहीं हेंही पंतप्रधानांनीं जाहीर केलें.

## हंगामी सरकारला दिलेलें स्वातंत्र्य

पंतप्रधानांच्या खुलाशानें मंत्रिशिष्टांच्या शिष्टाईबद्दल आशावाद प्रगट करण्यांत येत होता. मार्चपासून जूनपर्यंत वाटाघाटी सुरू होत्या. मध्येंच आशा-निराशेचें वादळ माजे. पण शेवटीं मंत्र्यांची दीर्घकालीन मुदतींची घटना—परिषदेबाबतची योजना सदोष असली तरीसुद्धां काँग्रेसनें स्वीकारली. पण हंगामी सरकारची योजना त्याज्य ठरवली. त्या योजनेप्रमाणें देशाचा घटना बनविण्याचा व स्वातंत्र्याचा सार्वभौम हक्क मान्य केला गेला. सक्तीची गटवारी, अगदींच हतबळ मध्यवर्ति सरकार, संस्थानी प्रतिनिधींच्या निवडींत संस्थानी प्रजेकडे दुर्लक्ष होण्याची भीति हे या योजनेंतील दोष असूनसुद्धां केवळ घटनास्वातंत्र्य मान्य झालें म्हणून काँग्रेसनें या योजनेचा स्वीकार केला व त्याचबरोबर खऱ्या अर्थाचें हंगामी राष्ट्रीय सरकार अस्तित्वांत आलें पाहिजे. अशी मागणी केली घटनात्मक फरक घडून न आला तरी प्रत्यक्ष व्यवहारांत व्हाइसरॉय घटनात्मक प्रमुख राहिले म्हणजे झालें. या काँग्रेसच्या मागणीस व्हाइसरॉयनीं मेच्या ३० तारखेस पत्र लिहून असा खुलासा केला कीं, ज्याप्रमाणें वसाहतींच्या सरकारांचा सल्ला घेतला जातो त्याप्रमाणेंच नव्या हंगामी सरकारचा सल्ला घेतला जाईल. रोजच्या व्यवहारांत हंगामी सरकारला जास्तींत जास्त 'स्वातंत्र्य' दिलें जाईल.

सरकार ज्या भावनेनें बनविलें जाईल तिला या असल्या आश्वासनांपेक्षां जास्त किंमत आहे. तुमचा माझ्यावर विश्वास असेल तर

★ ★ ★

★ ★ ★

हिंदुस्थानला बाहेरील दडपणाखालीं काम करावें लागणार नाहीं व घटना तयार होतांच हिंदुस्थान संपूर्ण स्वतंत्र व्हावा म्हणून सहकार्य करण्यास ब्रिटिश सरकारची तयारी आहे.

लीगनें हंगामी व कायम अशा दोन्ही योजना स्वीकारल्याच होत्या. या नव्या हंगामी सरकारांत संरक्षणासुद्धां सर्व खातीं हिंदी लोकांकडे जाण्याचें ठरलें होतें.

कॉंग्रेसनेंही या मिळालेल्या खुलाशांवर हंगामी सरकारांत भाग घेण्याची तयारी दाखविली व मग मंत्र्यांची निवड व खातेवांटणी हेच प्रश्न उरले.

संमिश्र मंत्रिमंडळानें कार्यक्रमांत सुसूत्रता रहाणार नाहीं व संयुक्त जबाबदारीला बाध येईल म्हणूनही कॉंग्रेसनें आक्षेप आणिले होते. पण ते आक्षेप त्यावेळीं गौण होते.

## व्हाइसरॉयनें सुचविलेली यादी

पण मंत्र्यांचीं नांवें, हिंदु-मुसलमानांचें त्यांतील प्रमाण व खातेंवांटणी याबाबत मतैक्य झालें नाहीं. सर्व मुसलमान प्रतिनिधि निवडण्याचा लीगचा आग्रह कायम होता. त्यामुळें व्हाइसरॉयनीं १६ जूनला पुढील १४ लोकांचीं नांवें हंगामी सरकारांतील मंत्री म्हणून जाहीर केलीं.

( १ ) सरदार बलदेवसिंग
( २ ) सर. एन. पी. एंजिनीयर
( ३ ) श्री. जगजीवनराम

★ ★ ★

★ ★ ★

(४) पं. जवाहरलाल नेहरू
(५) श्री. जीना
(६) नवाबजादा लियाकत अलीखान
(७) श्री. राजगोपालाचारी
(८) डॉ. राजेन्द्रप्रसाद
(९) श्री. एच. के. मेहताब
(१०) डॉ. जॉन मथाई
(११) नवाब महंमद इस्माइलखान
(१२) ख्वाजा सर नझिमुद्दिन
(१३) सरदार अबदुर रब निश्तार
(१४) सरदार वल्लभभाई पटेल

व्हाइसरॉयनीं हीं नावें जाहीर केलीं व त्याचबरोबर हें सांगितलें कीं, यांतील जर कोणी न येतील तर व्हाइसरॉय अडून बसणार नाहींत. ज्यांचें सहकार्य मिळेल त्यांच्यासह ते पुढें जातील.

या नांवास कॉंग्रेसनें हरकत घेतली. कारण यांत एकही राष्ट्रीय मुसलमान नव्हता. शिवाय सरदार अबदुर रब निस्तार हे सरहद्द प्रांतिक निवडणुकींत पराभूत झालेले असल्यानें त्यांचेही नांवास कॉंग्रेसनें विरोध केला. एंजिनीयर यांचे नांवास ते सरकारी नौकर असल्यानें विरोध केला व हरेकृष्ण मेहताब यांचे नांवाऐवजीं श्री० शरच्चंद्र बोस यांचें नांव सुचविलें.

कॉंग्रेसच्या लोकांनीं आपला निर्णय कॉंग्रेसवर सोंपविला. कॉंग्रेसनें ही योजना त्यांतील वर निर्दिष्ट केलेल्या दोषासाठीं झिडकारली. व मग

★ ★ ★

अनुक्रम
विभाग
दि.

★ ★ ★

व्हाइसरॉयनीं ही आपली योजना मागें घेतली. कारण काँग्रेसच्या सहकार्याविना राज्यकारभार चालवितां येणें शक्य नव्हतें म्हणून हंगामी सरकारबाबतचा प्रश्न तूर्त बाजूला ठेवून कांहीं युरोपियन सभासदांचें पालक सरकार नेमलें गेलें.

## अखेर काँग्रेसलाच शरण

घटना-समिति व हंगामी राष्ट्रीय सरकार यांचा निकटचा संबंध आहे. हंगामी सरकाराविना घटना–समितीचें कार्य सुकर होणार नाहीं. शिवाय देशांतील महत्त्वाच्या आर्थिक प्रश्नांचा निकाल ताबडतोब लावण्यास लोकप्रतिनिधींचीच आवश्यकता होती. लीगनें १६ जूनच्या आश्वासनाकडे बोट दाखवून हंगामी सरकार स्थापन झालें पाहिजे असा हट्ट धरला; पण एकदम काँग्रेसनें नकार दिल्यानें १६ जूनची योजना कोलमडलीच होती.

यानंतर जुलैमध्यें पुन्हां हंगामी सरकारबाबत वाटाघाटींना सुरुवात झाली व पत्रव्यवहारही झाला. पुढें २९ जुलैला लीगनें हंगामी व कायम अशा दोन्हीही योजनांचा आपला पाठिंबा मागें घेतला.

ऑगस्टमध्यें व्हाइसरॉयनीं पं. नेहरूंची भेट घेतली व त्यांस हंगामी सरकार बनविण्यास सांगितलें. मुस्लिम लीगचें सहकार्य मिळविण्याचा आटोकाट प्रयत्न करण्यांत आला.

दिल्लीस जाण्यापूर्वी पं. नेहरूंनीं जीनांची भेट घेतली, पण ती निष्फळ ठरली. पुढें ऑगस्टच्या शेवटच्या आठवड्यांत नेहरूंनीं हंगामी सरकार बनविलें व लीगला सहकार्यासाठीं आवाहन दिलें. त्यांचेसाठीं

★ ★ ★

★ ★ ★

दोन जागा मोकळ्या सोडण्यांत आल्या व शिवाय तीन जागा लीग येईल तेव्हां खालीं करून देण्याचें जाहीर करण्यांत आलें.

पं. नेहरूंनीं हंगामी सरकार बनवलें तेंच हिंदुस्थानचें पहिलें हंगामी राष्ट्रीय सरकार होय.

यानंतर यांत नुकताच लीगमंत्र्यांनीं प्रवेश केल्यानें मंत्रिमंडळाची पुनर्घटना झाली आहे.

★ ★ ★

## ६ : : हिंदुस्थानचे व्हाइसरॉय

★ ★ ★

"ब्रिटनचा घटनात्मक राजा नामधारीच आहे. अमेरिकन प्रेसिडेंटला व्यापक अधिकार असले तरी त्याचे जवळ राजदंडाचें वैभव नाहीं. फ्रान्सच्या अध्यक्षाला अधिकारही नाहींत व राजवैभवही नाहीं" पण हिंदी व्हाइसरॉयला अधिकार व राजवैभव दोन्हीही अमर्याद आहेत.

---

" The constitutional monarch of the United Kingdom reigns but does not rule, the President of the United States of America rules

★ ★ ★

★ ★ ★

आज सनदशीर भाषेनें आपण १९१९ च्या घटना कायद्याप्रमाणें मध्यवर्ति सरकार बनविलें असल्यानें त्या कायद्यानें गव्हर्नर जनरल व व्हाइसरॉय यांचा अधिकार काय आहे व आपण ज्या डोमिनियन स्टेटसबरोबर आपल्या हंगामी राष्ट्रीय सरकारच्या दर्जाची तुलना करतों त्यांतील डोमिनियन्सच्या गव्हर्नरच्या अधिकारांची मर्यादा काय आहे याची माहिती उद्‌बोधक ठरेल.

## व्हाइसरॉयचे अमर्याद अधिकार

हिंदी घटना कायद्यानें देशाच्या कारभाराची अंतिम जबाबदारी गव्हर्नर जनरल इन कौन्सिलवर आहे. गव्हर्नर जनरलनें नेहमीं आपल्या कार्यकारिणीच्या सल्ल्यानें चालावें असा दंडक असला तरी त्यावर अनेक खास जबाबदाऱ्या आहेत. त्या जबाबदाऱ्यांचें पालन करतांना त्यानें कोणाचाही सल्ला घेण्याची गरज नाहीं व सल्ला घेतला असल्यास तो बंधनकारक मानण्याचें कारण नाहीं. गव्हर्नर आपल्या अधिकारांत कायदे मंडळें बरखास्त करूं शकतो अगर त्यांची मुदतवाढही करूं शकतो. कोणतेंही बिल जरी विधिमंडळानें नापास केलें असलें तरी "ब्रिटिश हिंदुस्थानची सुरक्षितता, शांतता व हित यांसाठीं बिल पास होणें आवश्यक आहे" असा शेरा मारून तो आपणांस पाहिजे तें बिल पास करूं शकतो. तसेंच हिंदी सुरक्षितता व संरक्षण यांसाठीं आपल्या

---

but does not reign, the President of the French Republic neither reigns nor rules." Dicy.

★ ★ ★

★ ★ ★

अधिकारांत वाटेल तितका खर्च तो करूं शकतो. आपल्या कार्य-कारिणीच्या सल्ल्यानें असेंब्लीनें फेटाळलेले खर्च तो करूं शकतो. कोणत्याही पास झालेल्या बिलास गव्हर्नर जनरल पाहिजे तर संमति देऊं शकतो. कांहीं प्रकारचीं बिलें तर असेंब्लींत आणण्यासच त्याची आगाऊ परवानगी लागते. कोणते खर्च विधिमंडळाच्या मताच्या कक्षेंत येतात हेंही तोच ठरवितो. सर्व प्रांतिक गव्हर्नर त्याच्याच सल्ल्यानें वागतात.

बादशहांचे प्रतिनिधि म्हणून त्यास व्हाइसरॉय हा किताब आहे. इतर देश व हिंदी संस्थानें यांचे संबंध त्याच्या स्वतःच्या अखत्यारींतील प्रश्न आहेत ( नव्या हंगामी सरकारांतील परराष्ट्र खात्याकडे परराष्ट्रांशीं संबंधा-बाबत अधिकार गेले आहेत. ) हिंदी संस्थानिक व ब्रिटिश हिंदुस्थान यांमधील तो एक दुवा आहे.

हिंदुस्थानांतील अंतिम जबाबदारी ब्रिटिश पार्लमेंटवर आहे व ती जबाबदारी भारतमंत्री व्हाइसरॉयमार्फत पार पाडतात.

## वसाहतींतील गव्हर्नराचें संकुचित सत्ता-क्षेत्र

हिंदी राज्यकारभारांतील व्हाइसरॉयचें स्थान फारच महत्त्वाचें आहे. कोणत्याही देशाच्या राज्यकारभारांत कोणाही एका व्यक्तीस नसलेलें महत्त्व त्यास आहे.

या उलट वसाहतींतील गव्हर्नर हे केवळ नामधारी आहेत. त्यांच्या नेमणुकाही वसाहतींतील मंत्रिमंडळांच्या सल्ल्यानें होतात. त्यांस जादा

★ ★ ★

★ ★ ★

अधिकार कांहींहि नाहींत. त्यांचेवर विशेष जबाबदाऱ्या नाहींत. त्यांस मंत्रिमंडळाचे सल्ल्यानें सदासर्वदा वागावेंच लागतें. ब्रिटिश घटनेंत ब्रिटनच्या राजाला जें स्थान आहे तें स्थान वसाहतींच्या गव्हर्नरांना आहे. हंगामी सरकारचा व्यावहारिक दर्जा वसाहतींच्या सरकारांप्रमाणें होणार असल्यानें व्हाइसरॉय केवळ नामधारी प्रमुख बनले पाहिजेत; त्यांनीं आपले खास अधिकार, आपल्या विशेष जबाबदाऱ्या मंत्रिमंडळाकडे सोंपवाव्या व मंत्रिमंडळाचे सल्ल्यानेंच कारभार हांकावा.

## सध्यांचें मध्यवर्ति सरकार

आपल्या हंगामी राष्ट्रीय सरकारांत एकूण १४ मंत्री आहेत. यांतील पांच मंत्री कॉंग्रेसचे, पांच लीगचे व चार अल्पसंख्याकांचे प्रतिनिधि आहेत. अल्पसंख्याकांच्या प्रतिनिधींपैकीं हरिजनांचे प्रतिनिधि श्री. जगजीवनराम हे कॉंग्रेसचेच असून श्री. भाभा, श्री. जॉन मथाई व सरदार बलदेवसिंग यांची निवडही पं. नेहरूंच्या सल्ल्यानेंच झाली आहे.

कॉंग्रेसच्या पांच मंत्र्यांत श्री. असफअली हे एक राष्ट्रीय मुस्लिम मंत्री आहेत.

आपल्या पांच जागांपैकीं लीगनें एक जागा आंबेडकरपंथीय अस्पृश्यांचे एक प्रतिनिधि व बंगालच्या नझिमुद्दिन व सुऱ्हावर्दी मंत्रिमंडळांतील एक मंत्री श्री. जोगेंद्रनाथ मंडळ यांस दिली आहे. कोणीही मुस्लिमेतर लीगचा सभासद नसतांना कॉंग्रेसला खिजविण्यासाठीं लीगनें स्वतःचें नाक कापून कॉंग्रेसला अपशकून करण्याचें ठरविलें आहे.

★ ★ ★

# आपलें राष्ट्रीय सरकार

★ ★ ★

नव्या मंत्रिमंडळांत खालीलप्रमाणें खातेंवांटणी झाली आहे—

**काँग्रेस**

| | |
|---|---|
| पं. जवाहरलाल नेहरू ( उपाध्यक्ष ) | परराष्ट्र व वसाहतसंबंध |
| सरदार वल्लभभाई पटेल | गृह, माहिती व नभोवाणी |
| डॉ. राजेंद्रप्रसाद | अन्न व शेतकी |
| श्री. सी. राजगोपालाचारी | शिक्षण व कला |
| श्री. असफअल्ली | रेल्वे |
| श्री. जगजीवनराम | मजूर |

**लीग**

| | |
|---|---|
| श्री. लियाकतअली खान | अर्थ |
| श्री. इस्माइल चुंद्रिगार | व्यापार |
| श्री. अबदुर रब निश्तार | पोस्ट व विमान |
| श्री. गझनाफर अलीखान | आरोग्य |
| श्री. जोगेंद्रनाथ मंडळ | कायदेकानू |

**अल्पसंख्याक**

| | |
|---|---|
| सरदार बलदेवसिंग | संरक्षण |
| श्री. जॉन मथाई | उद्योगधंदे व पुरवठा |
| श्री. भाभा | खाणी, वर्क्स व शक्ति |

## प्रातिनिधिक स्वरूप

या मंत्रिमंडळांत संरक्षणमंत्री व परराष्ट्रमंत्रीहि आहेत. आजवर संरक्षणखातें सरसेनापतीकडे व परराष्ट्रखातें व्हाइसरॉयकडे असे. आतां

★ ★ ★

## आपलें राष्ट्रीय सरकार

★ ★ ★

फक्त राजकीय खातें व्हाइसरॉयकडे आहे व त्याची अधिकारमर्यादा हिंदी संस्थानिक व टोळीवाले व इतर मागासलेले लोक यांच्या प्रदेशापुरतीच आहे. हें मंत्रिमंडळ जरी घटनेप्रमाणें व्हाइसरॉयला जबाबदार रहाणार असलें तरी मध्यवर्ति विधिमंडळाचा त्यास पाठिंबा आहेच. असेंब्लींतील पहिल्या दोन नंबरच्या बहुमताचे पक्ष, कॉंग्रेस व लीग हे आतां सरकारी पक्ष झाले आहेत. त्यामुळें सर्वसाधारणपणें या दोन्ही पक्षांचा मंत्रिमंडळास पाठिंबा मिळेल असें गृहीत धरण्यास हरकत नाहीं.

यामुळें हें मंत्रिमंडळ प्रातिनिधिक आहेच. तें विधिमंडळास कायदेशीरपणें जबाबदार नसलें तरी खरोखरच तें विधिमंडळाला जबाबदार आहे. मंत्रिपदावरील साऱ्याच व्यक्ति आपापल्या पक्षांतील लोकादरास पात्र झालेले पुढारी आहेत. ते जनहिताकडे दृष्टि ठेवून जनतेच्या संमतीनेंच कारभार हांकतील.

पं. नेहरू म्हणतात त्याप्रमाणें आपणांस अजून स्वराज्य मिळवावयाचें आहे. हिंदुस्थानची घटनापरिषद हिंदी स्वातंत्र्याची घोषणा करील; परंतु स्वातंत्र्यप्राप्तीसाठीं देशांतील चाळीस कोटी अन्नवस्त्रप्रावरणाचा प्रश्न सोडविण्यासाठीं, देशाचा आर्थिक प्रश्न सोडविण्यासाठीं व आगामी घटनापरिषदेमार्फत हिंदी स्वातंत्र्य मिळविण्यासाठींच नव्या हंगामी सरकारची आवश्यकता आहे. हंगामी सरकार आपल्यापुढील हें कार्य करण्यास समर्थ ठरेल हें निश्चित. यांत लीगमंत्री सहकार्य करतील ही आशा आहे; त्यांनीं तें न केल्यास भावी प्रगति थोडी मंदावेल; पण म्हणून ती अडून बसणार नाहीं हें खास !

★ ★ ★

# उपसंहार

★ ★ ★

हें सरकार बनवितांना घटनात्मक फरक कांहीं झालेले नाहींत. व्हाइसरॉय यांचेकडे कायदेशीररीत्या कितीही अधिकार असले तरी ज्या आश्वासनांच्या पाठबळावर १९३७ मध्यें कॉंग्रेस मंत्रिमंडळें प्रस्थापित करण्यांत आलीं व पुन्हां १९४६ मध्यें मंत्रिमंडळें बनविण्यास कॉंग्रेसला अडचण भासली नाहीं तींच आश्वासनें ब्रिटिश सरकारनें वेळोवेळीं उच्चारलीं आहेत. व्हाइसरॉय यांनीं नवें मंत्रिमंडळ बनविलें त्यावेळीं केलेल्या नभोवाणीवरील भाषणांत या सरकारला जास्तींत जास्त स्वातंत्र्य सरकार देणार असल्याचें जाहीर केलें.

महात्माजी म्हणतात त्याप्रमाणें पूर्ण स्वराज्याचीं दारें आतां उघडलीं आहेत. अखिल भारतीय जनतेनें हा दिवस उजाडावा म्हणून आज साठ वर्षें वाट पाहिली होती, अत्यंत हालअपेष्टा सहन केल्या होत्या.

आजच आम्हांस कांहीं पूर्ण स्वराज्य मिळालेलें नाहीं, पण आजवरची ब्रिटिश व हिंदी नोकरशाही जाऊन तिची जागा जनतेच्या प्रातिनिधिक सरकारनें घेतली आहे. हें मंत्रिमंडळ सामुदायिक जबाबदारीनें कारभार

★ ★ ★

अनुक्रम 2८८·५१
विभाग ... नं आ
... ९९२३
37136



हांकणार आहे. या सरकारांतील मंत्री व्हाइसरॉयला घटनात्मक जबाबदार असले तरी ते आपली प्रत्येक गोष्ट केंद्रीय मंडळापुढें ठेवून त्यांचे मार्फत जनमताचा कौल घेणार आहेत व तो जेथपर्यंत त्यांचे बाजूनें आहे तेथपर्यंतच कारभाराचा गाडा ओढणार आहेत.

## नेहरू सरकारचा स्वातंत्र्याकडे मोर्चा

नव्या सरकारचा भर घटनात्मक परिस्थिति काय आहे यावर नसून देशाचें आत्मसामर्थ्य किती वाढलें आहे, जुलुमी साम्राज्यशाहीला आपला धिंगाणा घालणें किती अशक्य झालें आहे यावर आहे. नुसत्या कायद्याचें स्वातंत्र्य पुस्तकांत रहातें. शेवटीं तें मनगटाच्या जोरावरच टिकवावें लागतें. आजचें आपलें सरकार मनगटाच्या जोरावर स्वातंत्र्य मिळवीत आहे त्यास घटना-परिषदेमार्फत कायदेशीर स्वरूप मागाहून येईल.

आणि नेहरू सरकारनें अगदीं स्थापनेपासून स्वतंत्र पावलें टाकावयास सुरुवात केली आहेच. साम्राज्य सरकारनेंही काळ पालटला आहे हें ओळखून हिंदुस्थानांत ब्रिटिश हायकमिशनर नेमला व पर्यायानें हिंदुस्थानचा दर्जा इतर वसाहतींप्रमाणें असल्याची कबुली दिली. नेहरू सरकार आतां निरनिराळ्या देशांत आपल्या स्वतंत्र वकिलाती स्थापन करणार आहे. हिंदुस्थानांत ब्रिटिश सैन्य असेपर्यंत देशाला खरें स्वातंत्र्य नाहीं याची देशाला जाणीव आहेच. पण अनत्याचारी क्रांति घडवून आणण्यासाठीं स्वातंत्र्यावर कांहीं काळ एवढें बंधन स्वीकारावें लागत आहे.

मंत्रिमंडळें स्वीकारणें व घटना-समितींत भाग घेणें म्हणजे कॉंग्रेसचें

* * *

★ ★ ★

क्रांतिकारत्व नष्ट करणें नव्हे. १९४२ सालीं सुरू केलेल्या स्वातंत्र्य-संग्रामाचाच तो एक भाग आहे. मंत्रिमंडळें स्थापून स्वराज्य जवळ येत असल्याची खात्री असल्यानेंच हीं मंत्रिमंडळें स्थापण्यांत येत आहेत. ज्या जनतेच्या पुढाऱ्यांनीं आजवर आपल्या स्वातंत्र्य लढ्याचें नेतृत्व स्वीकारलें होतें त्यांनींच आज सरकार स्थापण्यांत धुरीणत्व पत्करलें आहे, तें आपण स्वतंत्र झालोंच या वृथाभिमानानें नव्हे तर आपण स्वतंत्र होणारच म्हणून.

" आपलें पुढील पहिलें कर्तव्य म्हणजे हिंदी स्वातंत्र्य व लोकशाही स्थापण्यासाठीं प्रयत्न करणें, हिंदी जनतेचें जीवनमान सुधारणें व सर्वत्र शांतता व स्वातंत्र्य प्रस्थापित व्हावें म्हणून स्वतंत्र राष्ट्र या नात्यानें आंतरराष्ट्रीय परिषदांत भाग घेणें. " या शब्दांत पं. नेहरूंनीं हंगामी सरकार कां बनविलें याचें उत्तर दिलें आहे.

## स्वातंत्र्याचा सूर्योदय

जनतेनें स्वतंत्र झालोंच या समजुतीवर स्वातंत्र्य-लढ्याच्या तयारींत शिथिलता आणतां कामा नये. राष्ट्रीय सरकारशीं सहकार्य करून त्यास आपला कार्यक्रम आंखण्यास संपूर्ण मोकळीक द्यावी व तो कार्यक्रम पार पाडण्यास मदत करावी. कॉंग्रेस कमिट्यांमार्फत जनतासंघटनाचें काम जास्त जोरांत सुरू राहीलच. बाबू पुरुषोत्तमदास टंडन म्हणतात त्याप्रमाणें आपण स्वातंत्र्यासाठीं घटनात्मक कार्य व क्रांतिकारी लढा एकदमच सुरू ठेवला पाहिजे.

घटना-परिषदेनें स्वतंत्र भारताची घटना ठरविल्यानंतर हिंदुस्थान

★ ★ ★

★ ★ ★

जरूर तर साम्राज्यांत न राहण्याचेंही ठरवील. या घटनास्वातंत्र्याचा हक्क म्हणजे हिंदुस्थानचा पूर्ण स्वराज्याचा हक्क. ज्याकरितां १८५७ सालीं अत्याचारी प्रयत्न झाले व १८८५ सालापासून कॉंग्रेसच्या नेतृत्वाखालीं सुसंबद्ध प्रयत्न होत होते त्यांस १९१९ सालीं अनत्याचारी सत्याग्रहाचा मार्ग पसंत झाला तो हक्क इतक्या हालअपेष्टानंतर मान्य झाला आहे. हा साम्राज्यशाहीचा पराभव व स्वातंत्र्याचा विजय आहे. हक्क मान्य होऊन त्याप्रमाणें घटनेची घडण घडत असल्यानें व हिंदुस्थानांत हंगामी राष्ट्रीय सरकार स्थापन होऊन आपलीं आजवरचीं स्वातंत्र्याचीं स्वप्नें खरीं ठरत आहेत. गुलामीची रात्र संपून स्वातंत्र्यउषेचें वातावरण पसरलें आहे. उषेनंतर स्वातंत्र्यसूर्य क्षितिजावर येण्याशिवाय गत्यंतरच नाहीं. निराशेचे व अडचणींचे मेघ जास्तींत जास्त सूर्यतेज पसरूं देणार नाहींत; पण म्हणून सूर्योदय झाल्याशिवाय रहाणार नाहीं!

संग्रहालय
अनुक्रम
विभाग
नों. दि.
IRBK-0102369
IRBK-0102369